। लातूर । वर्ष ३४ वे । अंक १८३ वा । शुक्रवार, दिनांक १० ऑक्टोबर २०२५ । पृष्ठे ६ । किंमत १ रू.
RNI 47034/64
लातूर समाचार
LATUR SAMACHAR
Email-dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

# ठाकरे बंधूंच्या युतीचा मुहूर्त ठरला

## बीएमसी ची निवडणूक जाहीर होताच होणार घोषणा

**मुंबई/प्रतिनिधी : मनसे अध्यक्ष राज ठाकरे व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची राजकीय आघाडी केव्हा होणार? असा प्रश्न सध्या अवघ्या महाराष्ट्राला पडला आहे. त्यातच आता ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत व मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या गत १० दिवसांत ३ बैठका झाल्या आहेत. या बैठकांत मुंबई महापालिकेची निवडणूक जाहीर होताच या दोन्ही पक्षांच्या युतीची घोषणा करण्याचा निर्णय झाल्याची माहिती आहे.**



महाराष्ट्रात दिवाळीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची घोषणा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सर्वच राजकीय पक्षांनी आपापली मोर्चेबांधणी केली आहे. शिवसेनेचा ठाकरे गट व मनसे यांनीही मराठीच्या मुद्यावर एकत्र येण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार, उद्धव व राज ठाकरे यांच्यातील सुसंवाद वाढला आहे. पण या दोघांच्या पक्षांच्या युतीची अधिकृत घोषणा अद्यापही झाली नाही. पण आता ती लवकरच होण्याचे संकेत मिळत आहेत. 'टीव्ही ९ मराठी'च्या वृत्तानुसार, मुंबई महापालिकेची निवडणूक जाहीर होताच या दोन्ही पक्षांच्या राजकीय युतीची घोषणा केली जाईल. एका मराठी वृत्तवाहिनीने यासंबंधीचे वृत्त दिले आहे.

सद्यस्थितीत मनसे व ठाकरे गटाची युती आकार घेण्यास सुरुवात झाली आहे. मागील १० दिवसांत संजय राऊत व राज ठाकरे यांच्यात तब्बल ३ बैठका झाल्यात. संजय राऊत यांनी शिवतीर्थ या राज ठाकरे यांच्या निवासस्थानी जाऊन या भेटी घेतल्याची माहिती आहे. युतीची चर्चा ही केवळ जागावाटपाच्या फॉर्म्युल्यापर्यंत मर्यादित नसते. तर प्रचारात कोणते मुद्दे असणार? किमान समान कार्यक्रम काय? दोन पक्षांच्या युतीत एखादा नवा पक्ष घ्यायचा काय? अशा विविध मुद्यांवर या चर्चेत उहापोह होतो. त्यामुळे संजय राऊत हे राज व उद्धव यांच्यात दुवा म्हणून काम करत आहेत.

सूत्रांच्या माहितीनुसार, मनसेसोबत युती करण्याच्या मुद्यावर चर्चा करण्यासाठी उद्धव ठाकरे यांनी वरुण सरदेसाई, अनिल परब आदी नेत्यांच्या खांद्यावर जबाबदारी टाकली आहे. पण जागावाटपाच्या चर्चेत काही पेच फसल्यास उद्धव व राज ठाकरे तथा संजय राऊत हे तीन नेते हा पेच सोडवण्याचा प्रयत्न करतील. कारण, या दोन्ही पक्षांचे मतदार जवळपास एकसारखेच आहेत. पुण्यात उद्धव ठाकरे गटाकडून वसंत मोरे, आदित्य शिरोडकर हे दोघे जागावाटपाची चर्चा करतील असे सांगितले जात आहे.

मनसे नेते अमित ठाकरे यांनी या प्रकरणी आपल्या पक्षाच्या नेत्यांच्या विभागवार बैठका घेतल्या आहेत. त्यात कोणत्या जागा मागायच्या? याची चाचपणी करण्यात आली. स्वतः मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुंबई शहर अध्यक्ष संदीप देशपांडे यांच्याशी संवाद साधला आहे. त्यांच्यासोबत या मुद्यावर विस्तृत चर्चा झाली. दरम्यान, ठाकरे गटाचे नेते ठाणे व पुण्यात शरद पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाला सोबत घेण्याच्या विचारात असल्याचीही माहिती आहे.



# फिलिपिन्समध्ये महाभूकंप!

## इमारती थरथरल्या, लोक सैरावैरा पळाले

**फिलिपिन्स/वृत्तसंस्था** : फिलिपिन्समध्ये शुक्रवारी सकाळी (दि. १०) ७.६ तीव्रतेचा शक्तिशाली भूकंप झाला. भूकंपाचा केंद्रबिंदू मिंडानाओ बेटाच्या दावाओ ओरिएंटल प्रांतातील मानय शहराजवळ समुद्रात १० किलोमीटर पाण्याखाली होता. त्यामुळे जमिनीवर जोरदार हादरे बसले. भूकंपानंतर त्सुनामीचा इशारा देण्यात आला असून किनारी भागांतील लोकांना स्थलांतरीत होण्याचा सल्ला दिला आहे.



फिलीपिन्सच्या भूकंप मापक संस्था फिव्होल्क्सने किनारी भागात १ मीटरपेक्षा जास्त उंचीच्या त्सुनामीच्या लाटा उसळू शकतात असे सांगितले आहे. लोकांना उंच जमिनीवर किंवा अंतर्गत भागात स्थलांतरित होण्याचा सल्ला देण्यात आला आहे. अद्याप कोणतीही जीवितहानी किंवा नुकसानीची माहिती मिळालेली नाही.

धोकादायक लाटांची शक्यता

दरम्यान, हवाई येथील पॅसिफिक त्सुनामी वॉर्निंग सेंटरने इशारा दिली आहे की, भूकंपाच्या केंद्राजवळ धोकादायक लाटा उसळू शकतात. फिलिपिन्सच्या किनारपट्टीवर काही ठिकाणी ३ मीटरपर्यंत उंचीच्या लाटांची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तसेच इंडोनेशिया आणि पलाऊमध्येही लाटा उसळू शकतात.

दक्षिण फिलिपिन्स प्रांताचे गव्हर्नर एडविन जुबाहिब यांनी स्थानिक माध्यमांना सांगितले की, भूकंपामुळे नागरिक घाबरून पळू लागले. काही इमारतींचे नुकसान झाले आहे. हा भूकंप अतिशय जोरदार होता, असे ते म्हणाले.

या घटनेचे अनेक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. आज झालेला हा शक्तिशाली भूकंप फिलिपिन्ससाठी मोठा धक्का आहे, दोन आठवड्यांपूर्वी येथे ६.९ तीव्रतेचा भूकंप झाला होता, ज्यात ७२ जणांचा मृत्यू झाला होता.

## शाळांमध्ये मराठी भाषा, राज्यगीत गायन अनिवार्य - शालेय शिक्षण मंत्री भुसे

सर्व शिक्षण मंडळाच्या समन्वयक, प्राचार्य यांची सहविचार बैठक

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य शिक्षण मंडळासह अन्य सर्व मंडळांच्या शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्ययन व अध्यापन अनिवार्य असून राज्यगीत गायन सुद्धा केले जावे, अशी सूचना शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी केली.

राज्यातील सर्व शिक्षण मंडळाच्या समन्वयक, प्राचार्य आणि शिक्षण विभागाचे अधिकारी यांची सहविचार बैठक मंत्रालयात आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी शालेय शिक्षण मंत्री भुसे बोलत होते. शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजित सिंह देओल, शिक्षण आयुक्त सच्चिंद्र प्रताप सिंह, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहुल रेखावार, शालेय शिक्षण विभागाचे उपसचिव तुषार महाजन, मुंबई विभागीय शिक्षण उपसंचालक राजेश कंकाळ यांच्यासह सीबीएसई, आयसीएसई, इंटरनॅशनल बोर्डाचे विविध समन्वयक व शाळांचे प्राचार्य आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.



## मुख्यमंत्र्यांच्या आदेशानंतरही बँकेकडून वसुलीची नोटीस: वरवडा गावच्या शेतकऱ्यांत नाराजी

**लातूर/प्रतिनिधी :** धाराशिव जिल्हा नंतर पुन्हा लातूर जिल्ह्यात बँकांच्या मनमानीचा प्रकार समोर आला आहे. राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट आदेश दिलेले असतानाही बँका शेतकऱ्यांना नोटिसा देणे थांबवत नसल्याचे समोर आले आहे. जिल्ह्यातील औसा तालुक्यातील वरवडा गावातील शेतकरी विशाल करंडे यांना बँकेने वसुलीची नोटीस पाठवल्याने संताप व्यक्त केला जात आहे. अतिवृष्टीने आधीच नुकसान सहन केलेल्या शेतकऱ्यांना अशा नोटिसा आल्यामुळे जखमेवर मीठ चोळल्यासारखे असल्याच्या भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केल्या आहेत.



मराठवाड्यातील लातूर जिल्ह्याला अतिवृष्टीचा मोठा फटका बसला आहे. त्यातही औसा तालुक्यात सर्वाधिक नुकसान झाले आहे. हे पाहण्यासाठी खुद्द मुख्यमंत्री औसा तालुक्याच्या दौऱ्यावर आले होते. त्यांनी पाहणी करून शेतकऱ्यांना दिलासा दिला जाईल, असे आश्वासन दिले. तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री यांनीही कोणत्याही शेतकऱ्याला बँका नोटिसा देणार नाहीत, असे जाहीर केले होते. असे असतानाही वरवडा गावात नोटीस आली.

## निलंगा तालुक्यात पूरग्रस्त परिसरातील महाआरोग्य शिबिरात ५१७ जणांची तपासणी

**निलंगा/आयुब बागवान:** निलंगा तालुक्यातील तगरखेडा येथील जवाहर मंगल कार्यालयात पूरग्रस्तांसाठी विशेष महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. आरोग्य संचालनालय, महाराष्ट्र शासन पुणे येथील संचालक डॉ. विजय कंदेवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत हे शिबिर यशस्वी झाले.

या शिबिरास उपसंचालक आरोग्य सेवा लातूर डॉ. रेखा गायकवाड, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी शिंदे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले आणि जिल्हास्तरीय साथरोग टीमची उपस्थिती होती. यावेळी संचालक डॉ. विजय कंदेवाड यांच्यासह संपूर्ण टीमने उपस्थितांना साथरोग प्रतिबंधात्मक उपाय, आजार, उपचार, असांसर्गिक आजार, मानसिक ताण-तणाव निर्मूलन, प्रौढ आरोग्य शिक्षण आणि सुदृढ जीवनशैली याबद्दल सखोल मार्गदर्शन केले.



या विशेष आरोग्य शिबिरात पूरग्रस्त गाव तगरखेडा येथील एकूण ५१७ स्त्री-पुरुषांची तपासणी करण्यात आली.

यात ४६ गर्भवती महिला, ११९ अत्यावश्यक चाचण्या, १२९ असांसर्गिक आजारांचे रुग्ण, १०८ नेत्ररोग तपासणी, ८४ प्रौढ शिक्षण आणि ३१ दंतरोग तपासणीचा समावेश होता.

तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रदीपकुमार जाधव यांच्यासह वैद्यकीय अधिकारी आणि आरोग्य कर्मचाऱ्यांनी हे शिबिर यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. तपासणी - संख्या गर्भवती महिला ४६ अत्यावश्यक चाचण्या ११९ असांसर्गिक आजार १२९ नेत्ररोग तपासणी, १०८ प्रौढ शिक्षण ८४ दंतरोग तपासणी ३१

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



भारतातील १०० अति श्रीमंताची एकूण संपत्ती रु सण ८८ लाख कोटी... मुकेश अंबानी

## चिमटा दयाचा



पावसाचा परिणाम भाजीपाल्यावर झाला आहे ! अनेक भाज्यांनी शंभरी पार केली आहे!! जगावे कसे हा प्रश्न निर्माण झाला आहे !!!

# जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्य आणि पंचायत समिती सभापती आरक्षण सोडत सोमवारी

## – आरक्षणाचे प्रारूप १४ ऑक्टोबरला होणार प्रसिद्ध
## – १७ ऑक्टोबरपर्यंत हरकती व सूचना सादर करता येणार

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील सर्व पंचायत समिती सभापती, जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य पदाच्या आरक्षण निश्चितीसाठी जिल्ह्यात १३ ऑक्टोबर २०२५ रोजी आरक्षण सोडतीचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा परिषद सदस्य आणि पंचायत समिती सभापती पदासाठी आरक्षण सोडत जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन समिती सभागृहात १३ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ वाजता होईल. तसेच पंचायत समिती सदस्य पदाची आरक्षण सोडत संबंधित तालुक्याच्या ठिकाणी निश्चित केलेल्या ठिकाणी याच दिवसी सकाळी ११ वाजता होणार आहे. तरी जिल्हा परिषद अथवा पंचायत समितीतील ज्या रहिवाशांची आरक्षण सोडतीच्या सभेस उपस्थित राहण्याची इच्छा आहे, त्यांनी या आरक्षण सोडत सभेस उपस्थित राहण्याचे अवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले आहे.

राज्य शासनच्या ९ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या अधिसुचनेनुसार लातूर जिल्हा परिषद अंतर्गत पंचायत समिती सभापती पदासाठी अनुसूचित जाती प्रवर्गासाठी एक, अनुसुचित जाती प्रवर्गातील महिलेसाठी एक, नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी (विमुक्त जाती व भटक्या जमातीसह) एक, नागरिकांचा मागास प्रवर्गातील (विमुक्त जाती व भटक्या जमातीसह) महिलेसाठी दोन, सर्वसाधारण प्रवर्गासाठी तीन, सर्वसाधारण प्रवर्गातील महिलेसाठी दोन असे आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार आरक्षण सोडत होईल.



जिल्ह्यात १३ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता लातूर पंचायत समिती सदस्य पदाची आरक्षण सोडत लातूर पंचायत समितीमधील तिसऱ्या मजल्यावरील सभागृहात, औसा पंचायत समिती सदस्य पदाची आरक्षण सोडत औसा तहसील कार्यालय परिसरातील प्रशासकीय इमारतीमधील सभागृहात, रेणापूर पंचायत समिती सदस्य पदाची आरक्षण सोडत रेणापूर पंचायत समितीच्या बैठक सभागृहात, अहमदपूर पंचायत समिती सदस्य पदाची आरक्षण सोडत अहमदपूर येथील नवीन प्रशासकीय इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील बैठक हॉलमध्ये, चाकूर पंचायत समिती सदस्य पदाची आरक्षण सोडत चाकूर पंचायत समिती सभागृहात, उदगीर पंचायत समिती सदस्य पदाची आरक्षण सोडत उदगीर येथील हावगीस्वामी महाविद्यालय जवळील शासकीय विश्रामगृह येथील बैठक हॉलमध्ये, जळकोट पंचायत समिती सदस्य पदाची आरक्षण सोडत जळकोट प्रशासकीय इमारतीमध्ये, निलंगा पंचायत समिती सदस्य पदाची आरक्षण सोडत निलंगा तहसील कार्यालय येथील तिसऱ्या मजल्यावरील बैठक सभागृहात, शिरूर अनंतपाळ पंचायत समिती सदस्य पदाची आरक्षण सोडत शिरूर अनंतपाळ तहसील कार्यालय येथे आणि देवणी पंचायत समिती सदस्य पदाची आरक्षण सोडत देवणी पंचायत समिती सभागृहात होईल.

जिल्हा परिषद व पंचायत समिती आरक्षणाचे प्रारूप १४ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रसिद्ध केले जाईल. या जिल्हा परिषद व पंचायत समित्यामधील निवडणूक विभागाच्या (गट) प्रारुप आरक्षणाबाबतच्या हरकती व सूचना जिल्हाधिकारी यांचेकडे आणि पंचायत समिती निर्वाचक गणाच्या (गण) प्रारुप आरक्षणाच्या हरकत व सूचना संबंधित तालुक्याचे तहसिलदार यांच्याकडे १४ ते १७ ऑक्टोबर, २०२५ या कालावधीत दाखल करता येतील, असे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.

## लातूर महानगरपालिकेच्या पी.एम. श्री शाळा मुख्याध्यापिका श्रीमती औटी चंद्रकला यांना 'आदर्श मुख्याध्यापक' पुरस्कार!



**लातूर/प्रतिनिधी** :महाराष्ट्र राज्य नगरपालिका व महानगरपालिका शिक्षक संघाचा राज्यस्तरीय आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार लातूर शहर महानगरपालिकेच्या पी.एम. श्री सावित्रीबाई फुले लातूर मनपा शाळा क्र. ०९ च्या मुख्याध्यापिका श्रीम. औटी चंद्रकला वसंतराव यांना नुकताच प्रदान करण्यात आला.

श्रीमती औटी यांनी शिक्षण क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची आणि शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या अथक प्रयत्नांची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. त्यांच्या नेतृत्वाखाली शाळेने शैक्षणिक व सांस्कृतिक स्तरावर मोठी प्रगती साधली आहे.

सातारा येथे एका दिमाखदार सोहळ्यात त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

पुरस्कार मिळाल्यावर त्यांनी हा सन्मान शिक्षक सहकारी आणि विद्यार्थ्यांच्या परिश्रमाचे फळ असल्याचे सांगितले, तसेच भविष्यातही शैक्षणिक प्रगतीसाठी कटिबद्ध राहण्याची ग्वाही दिली. लातूर मनपा शिक्षण मंडळाने त्यांचे अभिनंदन केले असून, त्यांचा आदर्श इतरांनीही घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.


ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## बिहारमध्ये सर्वांची चढाओढ

बिहार विधानसभेच्या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष वेधले आहे. बिहार असा प्रांत आहे की, सर्व काही दंडमशाही चालते म्हणून बऱ्याच वेळा उदा. देतात राज्याचे बिहार केले का? या बिहार मध्ये केंद्रीय निवडणूक आयोगाच्या घोषणेसह बिहारमध्ये पुन्हा लोकशाहीचा भव्य उत्सव सुरू झाला. यावेळी विधानसभेच्या निवडणुका केवळ दोन टप्प्यात होणार आहेत. बिहारसाठी ही सामान्य बाब नाही. एकेकाळी मतदान बूथवर ताबा मिळवणे आणि 'मसल पॉलिटिक्स'साठी ओळखले जाणारे हे राज्य आता शिस्त आणि विश्वासाचे प्रतीक बनताना दिसत आहे. तेथील निवडणूक शिस्त, विश्वास आणि मतदारांच्या सहभागाचा उत्सव असेल, अशी आशा आहे. हे तेच राज्य आहे ज्याने जयप्रकाश नारायण यांच्या आवाहनावर हुकूमशाहीला पराभूत केले आणि महात्मा गांधी यांना चंपारण्य दिले. संपूर्ण देशाला शिकवले की, लोकशाही केवळ मतदानाचा अधिकार बजावण्यापुरती मर्यादित नाही, तर लोकशाहीने दिलेल्या अधिकाराबद्दलचीही आहे. बिहारमध्ये केवळ राजकारण केले जात नाही, तर ते जगले जाते. बिहार आर्थिकदृष्ट्या मागासलेले मानले जाऊ शकते; पण राजकीयदृष्ट्या ते सर्वात परिपक्व राज्य आहे. त्याच्या मातीतून क्रांतीचा वास येतो. ही तीच भूमी आहे, जिथे ब्रिटिशांविरुद्ध पहिला लढा दिला गेला, जयप्रकाश नारायण यांना 'लोकनायक' बनवले गेले. तेथे लोकशाही ही केवळ एक व्यवस्था नाही, ती एक जीवनशैली आहे. ही निवडणूक फक्त सत्तेबद्दल नाही, तर विचारांबद्दलही आहे. बिहार जातीच्या समीकरणांच्या पलीकडे जाईल का? तरुण जातीपेक्षा रोजगार आणि शिक्षणाला प्राधान्य देतील का? यावेळी महिला निर्णायक भूमिका बजावतील का, हे प्रश्न या राज्याच्या प्रत्येक गावात आणि चौकात प्रतिध्वनीत होत आहेत. यावेळी लढाई चुरशीची आणि अटीतटीची आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) आणि इंडिया आघाडीमधील लढाई जुनी आहे; मात्र आता संदर्भ बदलले आहेत. दिल्लीच्या राजकारणाशी बिहारची केली जाणारी तुलना चुकीची आहे. दिल्ली आणि बिहार ही दोन वेगळी राज्ये आहेत. दिल्लीत राजकारण विचारांनी, तर तेथे भावनांनी चालते. दिल्लीत सत्ता मिळवण्यासाठी घोषणांची गरज असते, बिहारमध्ये विश्वासाची! मतदार पोस्टर किंवा प्रचारावर नव्हे, तर स्वतःच्या अनुभवावर निर्णय घेतात. तेथील गावातील रस्त्यावर बसलेला एक वृद्ध शेतकरी, रिक्षा चालवणारा एक तरुण, चहाच्या टपरीवर वाद घालणारा एक शिक्षक, तेथील प्रत्येकाला राजकारण समजते. मतदार कदाचित सुशिक्षित नसेल; पण तो राजकीयदृष्ट्या साक्षर आहे. प्रत्येक रस्त्यावर एक विश्लेषक असतो, जो जातीय समीकरणे, आघाड्यांची ताकद आणि नेत्यांच्या हेतूंवर त्यांचे मत मांडतो. ही बिहारच्या लोकशाहीची ताकद आहे. एनडीएमध्ये भाजप, जदयू आणि लोजपा यांचा समावेश आहे. हिंदुत्ववादी विचारांसह उच्च जातींमधील मतदारांवर भाजपची मजबूत पकड आहे, तर जदयू मागास वर्गातील मतदारांवर आणि महिलांवर अवलंबून आहे. नितीशकुमार यांची सर्वात मोठी ताकद महिला मतदारांमध्ये आहे. महिलांनी त्यांना वारंवार सत्तेत परत आणले. आरक्षण आणि दारूबंदीवरील त्यांच्या निर्णयांमुळे महिला मतदारांमध्ये त्यांच्याशी भावनिक बांधिलकी निर्माण झाली. दुसरीकडे भाजप विकास आणि राष्ट्रीय नेतृत्वाच्या नावाखाली मते मागतो आहे. नितीश कुमार यांचे वय आणि थकवा लोकांना दिसत असला, तरीही भाजप आणि त्यांच्या पक्षाची आघाडी अजूनही एक मजबूत जोडी आहे. 'लोजपा'चे चिराग पासवान त्यांच्या वडिलांच्या राजकीय छत्रछायेतून बाहेर पडण्यासाठी संघर्ष करत आहेत. लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या यशामुळे त्यांचे मनोबल वाढले आहे; पण त्यांच्या स्वतःच्या गटात त्यांना धोका आहे. त्यांचे काका पशुपती पारस, आता इंडिया आघाडीशी जवळीक साधत आहेत. दलित मतांमध्ये फूट पडणे एनडीएसाठी हानिकारक ठरेल. जीतन राम मांझी आणि उपेंद्र कुशवाहा यांसारख्या नेत्यांचा प्रभाव मर्यादित असू शकतो; पण बिहारच्या जातीय समीकरणांमध्ये त्यांची भूमिका महत्त्वाची आहे. म्हणूनच एनडीएत अजूनही युती एकसंध असल्याचे दिसून येते. राष्ट्रीय जनता दल हा इंडिया आघाडीचा प्राणवायू आहे. लालूप्रसाद यादव यांचे एमवाय समीकरण, त्यांची ही मुस्लीम आणि यादव मतपेटी अबाधित आहे. या दोन्ही समाजांतील एकत्रित मते बिहारमधील कोणत्याही निवडणुकीचा निकाल बदलू शकतात. तेजस्वी यादव यांनी बेरोजगारी, स्थलांतर आणि सामाजिक न्याय याबद्दल तरुणांच्या भाषेत बोलून तरुणांचे लक्ष वेधले आहे; पण राजदचे सर्वात मोठे आव्हान म्हणजे त्याची प्रतिमा. सत्तेत आल्यानंतर जंगलराज परत येते, असा या पक्षावर जुना आरोप. तेजस्वी ही प्रतिमा झटकून टाकण्याचा प्रयत्न करत आहेत; पण मार्ग सोपा नाही. काँग्रेस हा इंडिया आघाडीतील कमकुवत दुवा आहे. राहुल गांधी यांच्या मतदार हक्क यात्रेने काही ऊर्जा निर्माण केली; पण पक्षातील संघटनात्मक सुस्ती कायम आहे. यात्रा संपताच काँग्रेस पुन्हा पारंपरिक सुस्तीकडे वळल्याचे दिसते. डावे आणि मुकेश साहनी यांच्या पक्षाचा प्रभाव मर्यादित आहे; पण विरोधी मते एकत्र राहिली, तर बदल अशक्य नाही. या लढाईत एक नवीन खेळाडू म्हणजे प्रशांत किशोर यांनी उडी घेतली आहे. एकेकाळी राजकारणाचे चाणक्य म्हणून ओळखले जाणाऱ्या या रणनीतीकारांचा जनसुराज पक्ष निवडणूक रिंगणात आहे. त्यांचे स्वप्न 'बिहारचे केजरीवाल' बनण्याचे आहे; पण त्यांचा मार्ग कठीण आहे. ही अशी भूमी आहे, जी दिल्लीतील शक्तींना सातत्याने संकेत देत असते. येथेच खरी राजकारणाची नाडी धडधडते. म्हणूनच ही निवडणूक केवळ एका राज्याची नाही, तर संपूर्ण देशाची राजकीय दिशा ठरवेल. एनडीए पुन्हा सत्तेत आली, तर तो पंतप्रधान मोदी आणि भाजपसाठी राजकीय स्थिरतेचा संदेश असेल. तो देशाच्या विकासाला गती देणारा ठरेल. विरोधी पक्ष विशेषतः तेजस्वी यादव यांच्या नेतृत्वाखालील 'इंडिया' आघाडी जिंकली, तर तो सत्ताधार्यांना इशारा असेल. हे केवळ एक राज्य नाही, तर राजकीय बॅरोमीटर असल्याने देशाची जनता कोणत्या दिशेने विचार करत आहे, याची ही चाचणी ठरेल. सध्याला रालोआचे वर्चस्व दर्शवित आहे. निवडणुकीत अंतिमक्षणा पर्यंत कोण येणार याबाबत चर्चा दिसून येते.

# जगातील एक अब्जाहून अधिक लोक मानसिक आजारी - आव्हाने आणि समाजाची जबाबदारी



जगभरात दरवर्षी १० ऑक्टोबर हा दिवस जागतिक मानसिक आरोग्य दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ मानसिक आजारांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी नसून, मानसिक आरोग्याला समाजात प्राथमिकता देण्याचा एक व्यापक प्रयत्न आहे. आधुनिक जगातील दैनंदिन ताणतणाव, सामाजिक स्पर्धा, आर्थिक अस्थिरता आणि तंत्रज्ञानाच्या झपाट्याने वाढलेल्या संवादाच्या पद्धतींमुळे मानसिक आरोग्याची स्थिती गंभीर होत चालली आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या () २०२५ मध्ये प्रकाशित ' ' अहवालानुसार, जगभरात सुमारे एक अब्जाहून अधिक लोक मानसिक आजारांनी ग्रस्त आहेत. ही आकडेवारी केवळ संख्यात्मक तथ्य नाही, तर ही मानवतेसमोरील गंभीर आव्हाने आणि मानसिक आरोग्य सेवांमध्ये असलेल्या अंतराचे स्पष्ट प्रमाण आहे.

मानसिक आरोग्य समस्या ही केवळ रुग्णालयात उपचार घेण्याच्या गरजेपुरती मर्यादित नसून, ती व्यक्तीच्या संपूर्ण जीवनशैलीशी संबंधित आहे. जागतिक आरोग्य संघटनेने केलेल्या मानसिक आरोग्याच्या व्याख्येनुसार ''मानसिक आरोग्य ही अशी स्थिती आहे, ज्यामध्ये व्यक्ती आपल्यातील क्षमता ओळखून तिचा व्यवस्थित उपयोग करू शकते, तसेच जीवनातील ताणतणावास सामोरे जाण्यास मानसिक आरोग्य सक्षम स्थिती आहे, मानसिक सुदृढ व्यक्ती उत्पादकपणे कार्य करू शकते आणि समाजासाठी योगदान देऊ शकते.'' म्हणजेच मानसिक आरोग्याचा अर्थ केवळ मानसिक आजार नसणे नव्हे, तर जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता, समाजात सक्रिय सहभाग, आणि आत्मस्वीकृती यासह व्यक्तीची पूर्ण मानसिक क्षमता आहे.

मानसिक विकार अनेक प्रकारचे असतात, जसे की नैराश्य, चिंता विकार, बायपोलर डिसऑर्डर (द्विध्रुवीय विकार), स्किझोफ्रेनिया (ज्या रोगामध्ये विचार, भावना व कृती यांमध्ये फारकत पडत जाते असा मानसिक रोग), पोस्ट-ट्रॉमॅटिक स्ट्रेस डिसऑर्डर (आघातानंतरचा ताण विकार), आणि व्यसनाधीनता या विकारांमुळे केवळ व्यक्तीच नाही तर त्याचे कुटुंब, समाज आणि आर्थिक स्थिती देखील प्रभावित होते. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार, नैराश्य आणि चिंता विकार हे सर्वाधिक सामान्य आहेत, आणि त्यांचा परिणाम दीर्घकाळ टिकतो. मानसिक आजार हे अपंगत्वाचे दुसरे सर्वात मोठे कारण आहेत, ज्यामुळे रोजगार, उत्पन्न आणि सामाजिक सहभागावर प्रतिकूल परिणाम होतो.

जागतिक पातळीवर, मानसिक आरोग्याविषयी जागरूकता वाढली तरी, अजूनही अनेक लोकांना योग्य सेवा मिळत नाहीत. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार, मानसिक आरोग्यासाठी जागतिक आरोग्य बजेटचे फक्त २% निधी राखीव आहे, जो आर्थिक दृष्ट्या अत्यल्प आहे. उच्च उत्पन्न असलेल्या देशांमध्ये प्रति व्यक्ती ६५ अमेरिकन डॉलर्स इतका खर्च होतो, तर कमी उत्पन्न असलेल्या देशांमध्ये केवळ ०.०४ अमेरिकन डॉलर्स इतका खर्च केला जातो. या सुविधांच्या कमतरतेमुळे सुमारे ८०% मानसिक आजारी लोकांना आवश्यक उपचार मिळत नाहीत.

भारतामध्ये मानसिक आरोग्याचे संकट अधिक गंभीर आहे. राष्ट्रीय मानसिक आरोग्य सर्वेक्षण २०१५१६ नुसार, भारतात १८ वर्षांवरील १४% लोक मानसिक विकारांनी ग्रस्त आहेत. परंतु, केवळ १०१२% लोकांनाच उपचार मिळतात. उर्वरित ८८९०% लोकांना आवश्यक उपचार मिळत नाहीत, ज्यामुळे उपचार दरी अत्यंत मोठी आहे. या सर्वेक्षणानुसार, मानसिक विकारांमध्ये नैराश्य, चिंता विकार, आणि मद्यपान विकार हे सर्वाधिक आढळले. उपचार न मिळण्याची कारणे विविध आहेत, ज्यात सामाजिक कलंक, अज्ञान, आणि उपचारांच्या उपलब्धतेची कमतरता यांचा समावेश होतो. ग्रामीण भागात मानसिक आरोग्य सेवा अजूनही दुर्लभ आहेत. अनेकदा मानसिक विकारांना समाजात भूतबाधा, दैवी शाप, कमजोरी अशा चुकीच्या समजुतींशी जोडले जाते. या अज्ञानामुळे रुग्णांना योग्य वैद्यकीय उपचाराऐवजी पारंपारिक उपाय, झाडफ ुंक, जादूटोणा किंवा धार्मिक मार्गांचा आधार घ्यावा लागतो, ज्यामुळे आजार अधिक तीव्र होतो आणि समाजातून तुटतो.


महिलांचे मानसिक आरोग्य हा विशेष लक्ष देण्यासारखा भाग आहे. कौटुंबिक हिंसा, लैंगिक अत्याचार, सामाजिक असमानता, आणि घरगुती जबाबदाऱ्या यामुळे महिलांमध्ये मानसिक विकारांचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत दुप्पट आहे. मातृत्वोत्तर नैराश्य देखील या समस्येचा एक गंभीर भाग आहे. या सर्व कारणांमुळे महिलांच्या मानसिक आरोग्यावर सामाजिक दृष्ट्या गंभीर परिणाम होतो आणि त्यांना उपचार घेण्यास अडचणी येतात. तरुण पिढीमध्ये मानसिक आरोग्याची स्थिती अधिक चिंताजनक आहे. शैक्षणिक दडपण, करिअरची चिंता, कौटुंबिक अपेक्षा, आणि सोशल मीडियावरील तुलना या सर्वांमुळे नैराश्य, चिंता विकार, आणि एकाकीपण यांचे प्रमाण वाढले आहे. भारतात दरवर्षी १३,००० हून अधिक विद्यार्थी आत्महत्या करतात, जी शिक्षण प्रणालीतील गंभीर त्रुटी आणि मानसिक आरोग्याविषयीच्या अज्ञानाचे स्पष्ट उदाहरण आहे.

मानसिक आरोग्य सेवांमध्ये तज्ज्ञांची कमतरता, संसाधनांचा अभाव, आणि समुदाय आधारित सेवा मॉडेल्सची कमतरता यामुळे उपचार घेणे कठीण झाले आहे. भारत सरकारने २०१७ मध्ये मानसिक आरोग्य सेवा कायदा ( ) लागू करून मानसिक आरोग्याला कायदेशीर मान्यता दिली आहे. यामध्ये मानसिक आरोग्य सेवा सर्वांसाठी उपलब्ध करणे, रुग्णांच्या अधिकारांचे संरक्षण करणे, आणि मानसिक आरोग्याविषयी जनजागृती करणे यांचा समावेश आहे. () आणि () यांसारख्या कार्यक्रमांद्वारे ग्रामीण व शहरी भागात मानसिक आरोग्य सेवांचे जाळे मजबूत करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

समाजातील अंधश्रद्धा दूर करण्यासाठी व्यापक जनजागृती करणे आवश्यक आहे. शाळांमध्ये भावनिक शिक्षण, महाविद्यालयांमध्ये मानसिक आरोग्य क्लब, आणि ग्रामपंचायतींमध्ये समुदाय आधारित समुपदेशन सुरु करणे यामुळे मानसिक आरोग्याविषयी जागरूकता वाढेल. रुग्णांना योग्य उपचार मिळवण्यासाठी प्रोत्साहन मिळेल आणि सामाजिक कलंक कमी होईल. व्यक्तिगत पातळीवर मानसिक आरोग्य टिकवण्यासाठी योग, ध्यान, विपश्यना, व्यायाम, निसर्गाशी संबंध, संगीत आणि संवाद या सर्व गोष्टी अत्यंत उपयोगी आहेत. भावनिक साक्षरता वाढवणे, आत्मस्वीकृती, आणि सहानुभूती यांचा विकास देखील मानसिक आरोग्यासाठी महत्त्वपूर्ण आहे.

मानसिक आरोग्य ही केवळ वैयक्तिक समस्या नाही, तर ती सामाजिक, आर्थिक आणि सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या () २०२५ मध्ये प्रकाशित ' ' अहवालानुसार, जगातील एक अब्जाहून अधिक लोक मानसिक आजारांनी ग्रस्त आहेत, आणि या संख्येत नैराश्य आणि चिंता विकार सर्वाधिक आहेत. या गंभीर समस्येवर उपाय शोधण्यासाठी शासन, समाज, शाळा, महाविद्यालये, कुटुंबे आणि व्यक्तींनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. मानसिक आरोग्याविषयी जागरूकता वाढवणे, उपचारांची उपलब्धता सुनिश्चित करणे, अंधश्रद्धा दूर करणे, आणि सकारात्मक मानसिक आरोग्याचा प्रचार करणे या सर्व गोष्टी आवश्यक पाऊले आहेत.

१० ऑक्टोबर रोजीचा जागतिक मानसिक आरोग्य दिन केवळ औपचारिक दिवस नसून, तो आपल्याला मानसिक आरोग्याच्या गंभीरतेची जाणीव करून देणारा आणि बदलासाठी प्रेरित करणारा दिवस आहे. प्रत्येक नागरिकाने स्वतःच्या मानसिक आरोग्याकडे लक्ष देणे, आजारांवर लवकर उपचार घेणे आणि समाजातील इतर व्यक्तींना प्रोत्साहन देणे यासाठी सजग राहणे आवश्यक आहे. ''मानसिक आरोग्याशिवाय आरोग्य नाही. ही जागतिक आरोग्य संघटनेची शिकवण आज आपल्या सर्वांसाठी मार्गदर्शक ठरते.



**डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**मो. क्र. ९९६०१०३५८२,**

# सायंकाळी ७ च्या अगोदर करा रात्रीचं जेवण, आरोग्याला होतील ६ जबरदस्त फायदे

शरीराच्या आरोग्यासाठी चांगले अन्न खाणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच ते अन्न योग्य वेळी खाणेही महत्त्वाचे आहे. आज बदलत्या दैनंदिन दिनचर्येमुळे आणि खाण्याच्या अनियमित सवयींमुळे आपली खाण्याची वेळही ठरलेली नाही. अशा परिस्थितीत आपण अनेकदा रात्रीचे जेवण उशिरा करतो. त्यामुळे हळूहळू आपण अनेक प्रकारच्या आरोग्य समस्यांना बळी पडतो. जर तुम्हाला तुमच्या आरोग्याबाबत जागरुक राहायचे असेल तर तुम्ही तुमचा नाश्ता, दुपारचे जेवण आणि रात्रीच्या जेवणाची वेळ निश्चित करा. जाणून घ्या रात्री लवकर जेवण केल्याने आपल्या आरोग्यासाठी कोणते फायदे होतात.

**झोप सुधारते**

रात्रीचे जेवण लवकर खाल्ले तर शरीराला पोषक तत्वे पचायला पुरेसा वेळ मिळतो. त्यामुळे आपली झोप सुधारते. तज्ज्ञांच्या मते, रात्री झोपण्याच्या सुमारे ३ तास आधी आपण रात्रीचे जेवण केले पाहिजे. त्यामुळे आपल्याला पचनासाठी पुरेसा वेळ मिळतो.

**बद्धकोष्ठता संपेल**

आज बदललेल्या जीवनशैलीमुळे बद्धकोष्ठता ही गंभीर समस्या बनत चालली आहे. बद्धकोष्ठतेमुळे व्यक्तीला शौच करताना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. जर तुम्ही रात्रीचे जेवण लवकर खाल्ले तर ते तुमच्या शरीराला पचनासाठी पुरेसा वेळ देते. यामुळे तुम्हाला बद्धकोष्ठता, अपचन आणि सूज येणे या समस्यांपासून आराम मिळतो.

**हृदय निरोगी राहील**

जे लोक रात्री उशिरा जेवतात त्यांना हृदयाशी संबंधित आजारांचा धोका जास्त असतो. याउलट जे लोक रात्रीचे जेवण लवकर करतात. त्यांच्या हृदयाशी संबंधित आजारांचा धोका लक्षणीयरीत्या कमी होतो.

**साखर नियंत्रणात राहील**

रात्रीचे जेवण लवकर खाल्ल्याने आपली साखरेची पातळीही नियंत्रणात राहते. यामागचे कारण असे आहे की अन्न लवकर खाल्ल्याने आपले शरीर प्रभावीपणे इन्सुलिनचा वापर करू शकते. त्यामुळे मधुमेहाचा धोका कमी होतो.

**संप्रेरक शिल्लक**

इंसुलिन आणि कॉर्टिसॉल सारखे हार्मोन्स आपल्या शरीरात एक विशिष्ट कालावधी पाळतात. म्हणूनच रात्री लवकर अन्न खाल्ल्याने आपल्या शरीरातील नैसर्गिक प्रणाली सुधारण्यास मदत होते. त्यामुळे आपली चयापचय क्रिया ठीक राहते. त्यामुळे आपल्या शरीरात हार्मोन्सचे संतुलनही राखले जाते.

**रात्री उशिरा अन्न खाण्याचे तोटे**

जर तुम्ही रात्री झोपण्याच्या काही वेळापूर्वी अन्न खाल्ले तर. त्यामुळे तुम्हाला अनेक प्रकारच्या आरोग्य समस्यांना सामोरे जावे लागू शकते. ज्यामध्ये अपचन, आम्लपित्त आणि बद्धकोष्ठता यासारख्या समस्यांचा सम ावेश होतो. जेव्हा आपण जेवल्यानंतर लगेच झोपतो तेव्हा आपल्या पचनसंस्थेला अन्न हलवताना खूप त्रास होतो. त्यामुळे अनेक प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागते.

# माहितीचा मौलिक अधिकार

आपल्या देशात नागरिकांना उपलब्ध असलेल्या सर्वात महत्त्वाच्या म्हणजे माहितीचा अधिकार अधिनियम२००५ या कायद्याविषयीच्या जनजागृतीसाठी ६ ते १२ ऑक्टोबर या कालावधीत ''माहिती अधिकार सप्ताह'' साजरा करण्यात येतो. यानिमित्ताने या लक्षवेधी कायद्याविषयी थोडक्यात माहिती

माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ हा कायदा आपल्या देशात अंमलात आल्यापासून मुलभूत मानवाधिकाराला महत्त्व प्राप्त झाले. पारदर्शकतेचे नवे पर्व सुरु झाले. या कायद्याला आता २० वर्ष पूर्ण झाली असून अजूनही हा कायदा विकासप्रक्रीयेत अत्यंत महत्त्वाची आणि प्रभावशाली भूमिका बजावत आहे. माहितीच्या अधिकाराबाबत सर्वप्रथम स्वीडन देशात १७६६ मध्ये 'फ्रीडम ऑफ प्रेस ॲक्ट' पारित करुन माहितीचा अधिकार सर्वप्रथम मान्य करण्यात आला. स्वीडननंतर अमेरिका, डेन्मार्क, फिनलँड, नॉर्वे, फ्रॉन्स, कॅनडा, स्पेन, जपान या देशांनी माहितीच्या अधिकाराचे कायदे केले. संयुक्त राष्ट्रसंघाने देखील त्यांच्या १९४८ च्या आमसभेच्या पहिल्या अधिवेशनात युनिव्हर्सल डिक्लेरेशन ऑफ ह्यूमन राईटसची घोषणा करुन नागरिकांना माहिती मिळवण्याचे स्वातंत्र्य हा मूलभूत मानवाधिकार असल्याचे आपल्या ठरावात संमत केले.

अधिकाराने जगभर पारदर्शकतेचे नवे पर्व सुरु केले आहे. विविध देशात झालेल्या अशा कायद्यामुळे खुल्या शासन व्यवस्थेच्या प्रक्रियेला गती मिळत आहे. त्याचा एक भाग म्हणून २८ सप्टेंबर, २००२ मध्ये फ्रीडम ऑफ इन्फार्मेशन नेटवर्क या नावाने बल्गेरियामध्ये माहिती अधिकाराने भारलेल्या संघटना व कृतिगटांचे एक नवे कृतिशील संघटन जाळे उभारण्यात आले. तेव्हापासून जगभर माहिती अधिकाराची जागृती वाढावी, तसेच या कायद्याच्या अंमलबजावणीतून विविध देशातील माहिती अधिकार कायद्यामुळे जगभर पारदर्शकतेचे नवे पर्व सुरु झाले व खुल्या शासन व्यवस्थेच्या प्रक्रियेला गती मिळाली. या कायद्याच्या अंमलबजावणीतून पारदर्शकता व उत्तरदायित्वाची संस्कृती गतीमान व्हावी, यासाठी व खुल्या शासन व्यवस्थेसाठीची बांधिलकी व्यक्त करण्यासाठी २८ सप्टेंबर हा जागतिक माहिती अधिकार दिन म्हणून साजरा केला जाऊ लागला. महाराष्ट्र शासनाने देखील २० सप्टेंबर, २००८ च्या शासन निर्णयानुसार २८ सप्टेंबर हा दिवस माहिती अधिकार दिवस घोषित केला असून माहितीचा अधिकार कायद्याविषयी जनजागृती व्हावी म्हणून या दिवशी व्यापक प्रमाणात उपक्रम राबविण्याचे निर्देश दिले आहेत.

केंद्रीय माहिती कायदा

भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद १९ (१) (क) मध्ये भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यामध्येच माहितीचा अधिकार अंतर्भूत आहे म्हणूनच माहितीचा अधिकार हा मूलभूत अधिकार असल्याचे मत सर्वोच्च व उच्च न्यायालय यांनी भारतातील विविध न्यायनिवाड्यात व्यक्त केले आहे. भारतात केंद्रीय माहिती अधिकार कायद्याला १५ जून, २००५ रोजी राष्ट्रपतींची मान्यता मिळाली व कायद्यातील काही तरतुदी अंशत: लागू करण्यात आल्या. तर १२ ऑक्टोबर, २००५ पासून या कायद्याची अंमलबजावणी जम्मू काश्मीर राज्य वगळता संपूर्ण भारतात सुरु झाली. त्यानिमित्त ६ ते १२ ऑक्टोबर या कालावधीत माहिती अधिकार सप्ताह साजरा करण्यात येतो.

महाराष्ट्र माहितीचा अधिकार

केंद्रीय कायदा येण्यापूर्वीच ९ राज्यांनी माहितीचा अधिकार कायदा तसेच ३ राज्यांनी त्यासंबंधीचे विधेयके, कोड बनवण्यास सुरुवात केली होती. राजस्थानातील सामाजिक लेखापरिक्षणाच्या यशस्वी चळवळीपासून प्रेरणा घेऊन महाराष्ट्रामध्ये माहितीचा अधिकार कायदा-२००२ संमत करण्यात आला. या कायद्यासंदर्भात देश व आंतरराष्ट्रीय पातळीवर बदलत चाललेले वातावरण तसेच ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी आंदोलनाच्या माध्यमातून धरलेल्या आग्रहाखातर महाराष्ट्र शासनाने तज्ज्ञ समितीच्या शिफारशीनुसार २००२ मध्ये कायद्यात सुधारणा करुन त्याची प्रभावी अंमलबजावणी केली. माहिती अधिकार काही राज्यात पूर्वीपासून अंमलात होता. तथापि, माहिती अधिकाराचा कायदा पारित करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले.

माहिती अधिकाराचा उद्देश

नागरिकांना आवश्यक असलेली माहिती पुरविणे, प्रशासनात शिस्त निर्माण करुन अधिकाऱ्यांच्या कार्यपध्दतीत व कार्यक्षमतेत वाढ करणे, शासन यंत्रणेतील व्यवहारात पारदर्शकता आणणे, भ्रष्टाचाराचे समूळ निर्मूलन व्हावे, प्रशासकीय कार्यपध्दती, नियम व इतर शासकीय कामांमध्ये गैरव्यवहारात वाव राहू नये, शासकीय कार्यपध्दतीबद्दल सामान्य जनतेला सांशकता वाटू नये व त्यांची कामे विनाविलंब, सहजगत्या व्हावीत यासाठी माहितीचा अधिकार या कायद्याची निर्मिती झाली.

कायद्याची विशेषता

शासनाने आतापर्यंत केलेल्या सर्व कायद्यामागे जनतेचे हीत हाच मुख्य हेतू होता. परंतु इतर सर्व कायदे व माहितीच्या अधिकाराचा कायदा यात मुख्य फरक असा आहे की, हे सर्व कायदे जनतेने पाळावे या अपेक्षेसह शासकीय अधिकाऱ्यांकडून त्यावर देखरेख होत होती. या भुमिकेमुळे जनता दुय्यम ठरत होती. परंतु माहितीचा अधिकार या कायद्यामुळे सर्वसामान्य नागरिकाला संसद सदस्याच्या बरोबरीची माहिती प्राप्त करण्याचा अधिकार मिळाला आहे. प्रशासकीय अधिकारी, सार्वजनिक प्राधिकरण, शासकीय कर्मचारी आपले काम प्रामाणिकपणे करतात की नाही हे सर्वसामान्य व्यक्ती पाहू शकणार आहे तर जनतेच्या अपेक्षेला शासकीय अधिकारी पुरे पडतात का याचीही तपासणी शासनाला करता येणार आहे.

एखादी व्यक्ती जी माहिती मागेल त्याला ती माहिती ठराविक कालावधीत देण्याचे या कायद्यानुसार सार्वजनिक प्राधिकरणांवर बंधन असल्यामुळे शासकीय कारभार आपोआपच अधिकाधिक पारदर्शक बनत जाईल. त्यामुळे भ्रष्टाचार आपोआप कमी होऊन राज्यकारभार जनताभिमूख होईल, हेच या कायद्याचे सामर्थ्य आहे.

कायद्यातील तरतुदी

कोणत्याही भारतीय नागरिकाला माहिती मागण्याचा अधिकार आहे. माहिती कोणत्या कारणासाठी हवी आहे, हे उघड करणे बंधनकारक नाही. माहिती मागण्यासाठी साधा अर्ज आणि दहा रुपये शुल्क, जीवित स्वातंत्र्य या संदर्भातील माहिती ४८ तासात देणे बंधनकारक आहे. सर्वसाधारण माहिती देणे अथवा नाकारणे यासाठी सर्वसाधारणपणे ३० दिवसाची मुदत, सहायक माहिती अधिकाऱ्यांकडे दाखल झालेल्या अर्जासाठी ३५ दिवस तर त्रयस्थ व्यक्तींचा संबंध येत असल्यास माहिती पुरवण्यासाठी ४० दिवसांची मुदत देण्यात आली आहे. विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्यास अथवा मिळालेल्या माहितीने समाधान न झाल्यास प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांकडे ३० दिवसात अपिल करता येईल. तेथूनही समाधान न झाल्यास राज्य माहिती आयोगाकडे ९० दिवसांच्या आत दुसरे अपील करता येते. विवक्षित गुप्तवार्ता व सुरक्षा संघटना, मानवी हक्कांचे उल्लंघन इत्यादींशी संबंधित माहिती देता येणार नाही.

जन माहिती अधिकारी म्हणून जिल्हा किंवा तालुकास्तरावर कोणतेही वेगळे कार्यालय नाही. शासनाने प्रत्येक कार्यालयात जन माहिती अधिकारी पदनिर्देशित केले आहेत. आपल्याला ज्या कार्यालयाशी संबंधित माहिती हवी आहे त्या प्रत्येक कार्यालयातील जनमाहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर करावा. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हा संबंधित कार्यालयाच्या वरिष्ठ कार्यालयाचा अधिकारी असतो. द्वितीय अपिल दाखल करण्यासाठी शासनाने बृहन्मुंबई, कोकण, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, अमरावती आणि मुंबई या सर्व विभागीय मुख्यालयाच्या ठिकाणी आयोगाचे खंडपीठ स्थापन केले आहेत. माहिती आयुक्तांचा निर्णय हा दुसऱ्या अपिलानंतरचा अंतिम निर्णय राहील. या निर्णयाविरुध्द कोणत्याही कोर्टात दावा किंवा खटला दाखल करता येत नाही.

माहितीच्या अधिकाराविषयीचा अर्ज दाखल करताना हव्या असलेल्या माहितीचे वर्णन योग्य रितीने मांडले जाणे अतिशय महत्वाचे आहे. प्रश्नार्थक स्वरुपाची, कारणे विचारणारी माहिती, मुद्दा नसलेले किंवा गैरसमज उत्पन्न करणारे अर्ज फेटाळण्याची शक्यता अधिक असते. एका अर्जात एका विषयाशी संबंधितच माहिती विचारावी. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना ५० पृष्ठापर्यंतची माहिती मोफत देता येते.

महाराष्ट्र शासनाने ई-गव्हर्नन्सला नेहमीच महत्व दिले आहे. इलेक्ट्रॉनिक साधनाद्वारे माहिती मिळविण्याची इच्छा असलेल्या व्यक्ती व नागरिकांकडून आलेले अर्ज स्विकारण्यासाठी व संबंधित माहिती देण्यासाठी शासनाने www.rtionline.maharashtra.gov.in या नावाचे पोर्टल सुरु केले आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कायदा अंमलात आल्यापासून त्याचा वापर करणाऱ्यांची संख्या वाढतच असून या कायद्याचा प्रचार व प्रसार यातून नागरिकांना त्यांच्या हक्काची जाणीव होत आहे. कायद्याचा वापर करण्यात महाराष्ट्र देशात अव्वल आहे. अधिकाधिक लोकांनी या कायद्याचा वापर करावा हा शासनाचा उद्देश सफल होत असल्याचे दिसून येते. देशातील अनेक घोटाळे उघडकीस आणण्यामागचा शिल्पकार माहिती अधिकार कायदा आहे. सामाजिक परिवर्तनासाठी माहितीचा अधिकार म्हणजे एक शस्त्र आहे. याचा योग्य वापर व्हावा, ही अपेक्षा.

**- अनिल आलुरकर, उपसंचालक (माहिती)**
**विभागीय माहिती कार्यालय, अमरावती**

# शारिरीक आरोग्या सोबत मानसिक आरोग्य का महत्त्वाचे?

आपण अशा जगात जगतो जे तग धरण्याचा गौरव करते, पण विश्रांती कशी घ्यावी हे क्वचितच शिकवते. अशा संस्कृतीत, जिथे उत्पादनक्षमता (ïî– वींलींळींळीूं) ला महत्त्व दिलं जातं, पण मन:शांती अनेकदा दुर्लक्षित राहते. अनेक लोक अजूनही शांततेत पीडा सहन करतात. भावनिक थकव्याला फक्त ताण समजून दुर्लक्ष करतात, किंवा स्वत:ला सतत मजबूत राहायलाच हवं असं पटवून देतात. पण मानसिक आरोग्य हा आजाराचा अभाव नाही; तो भावनिक संतुलन, मानसिक स्थैर्य आणि स्वत:शी व इतरांशी जोडण्याची क्षमता असणे हे आहे. जागतिक आकडेवारीनुसार, पाचपैकी एक व्यक्तीला त्यांच्या आयुष्यात कधीतरी मानसिक आरोग्याचा आव्हान येतो. तरीही, कलंक आणि जागरूकतेचा अभाव अनेकांना आवश्यक मदत शोधण्यात अडथळा निर्माण करतो. चिंता, नैराश्य, मानसिक थकवा किंवा फक्त ओव्हरव्हेल्म झाल्यासारखे वाटणे. हे दुर्बलतेची लक्षणं नाहीत. हे स्वत:साठी उपलब्ध असण्याची लक्षणे आहेत. त्याकडे दुर्लक्ष केल्याने ते नुसते निघून जात नाहीत; फक्त बरे होणे अधिक कठीण बनते.



# खरे धाडस

कथा : रमेश तांबे



पावसाळ्याचे दिवस होते. भरपूर पाऊस पडत होता. ओढे-नाले-नद्या दुथडी भरून वाहत होत्या. सारे जंगल पाणीमय झाले होते. जंगलातले असंख्य प्राणी भीतीने घाबरून गेले होते. पक्ष्यांनी झाडांचा आश्रय घेतला होता. पण किती दिवस पावसात भिजत राहणार. मग सगळे प्राणी एका उंच टेकडीवर जमले. जसे गवत खाणारे प्राणी आले, तसे मांस खाणारेद-खील आले. आता कुणाला कुणाची भीती वाटत नव्हती. कारण प्रश्न सगळ्यांच्या जीवनमरणाचा होता. त्यामुळे लांडग्याच्या बाजूला ससा आणि वाघाच्या बाजूला हरिण उभे होते. प्रत्येकाच्या डोळ्यांत भीती दाटली होती. कारण असाच पाऊस चालू राहिला तर ही टेकडीसुद्धा पाण्याखाली जाणार होती. सगळेच प्राणी चिंताक्रांत होते.

अशावेळी एक छोटा हत्ती मोठं धाडस करीत म्हणाला, आपले सिंह महाराज कुठे आहेत? ते आपले राजे आणि आपण त्यांची प्रजा. मग त्यांनी आपली राहण्याची काहीतरी सोय केली पाहिजे. छोट्या हत्तीच्या आईने त्याला नजरे-नेच 'गप्प बस' असा इशारा दिला. तोच सिंह महाराजांची गर्जना ऐकू आली. तशा वाता-वरणातही सगळे प्राणी अगदी घाबरून गेले. कारण जेव्हा महाराज रागावलेले असतात तेव्हा अशा प्रकारची ते गर्जना करतात. त्यामुळे जो तो छोट्या हत्तीकडे बघू लागला. कारण त्याने महाराजांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून दिली. हा महाराजांचा अपमान आहे आणि म्हणूनच सिंह महाराज चिडले आहेत असं सगळ्यांना वाटत होतं. आता मात्र छोट्या हत्तीची आई घाबरली. सिंह महाराज आपल्या बाळाचं काही बरं वाईट तर करणार नाही ना? अशी तिला भीती वाटू लागली. तेवढ्यात मोठ्या ऐटीत आ-पली भलीमोठी आयाळ हलवीत, डौलदार पाय टाकीत सिंह महाराज गर्जना करीतच टेकडीवर आले. ते पावसात भिजू नये म्हणून एका जिराफाने त्यांच्या डोक्यावर पानांची छत्री धरली होती. महाराजांसोबत त्यांचे मंत्रीदेखील हजर होते. सर्वजण टेकडीवर पोहोचले. तशी पावसाने विश्रांती घेतली.मग प्रधानमंत्री लांडगे दादा पुढे आले आणि त्यांनी बोलायला सुरुवात केली. तसा छोटा हत्ती लपून बसण्याऐवजी पुढे आला आणि सिंह महाराजांच्या नजरेला नजर भिडवू लागला. त्यांच्याकडे बघत राहिला. महाराजांना त्यांच्या कर्तव्याची आठवण करून देणारा कोण होता? कोणी केली ही हिंमत? कोण आहे तो? त्यांनी समोर यावं! तसे सगळे प्राणी घाबरले. आता छोट्या हत्तीचे काही खरे नाही याची जाणीव सगळ्यांनाच झाली. छोट्या हत्तीची आई तर खूपच घाबरली. जो तो छोट्या हत्तीकडे टकामका बघू लागला. मग छोटा हत्तीच म्हणाला, होय मीच तो!

छोटा हत्ती सांगू लागला, खूप पाऊस पडतोय. सगळं जंगल पाण्याखाली गेलंय. कित्येक जण वाहून गेलेत. भीतीचं प्रचंड वातावरण सगळीकडे असताना सिंह महाराजांकडून कोणतीही मदत आम्हाला मिळाली नाही. साधी चौकशीदेखील कोणी केली नाही. शेवटी आम्ही आहोत म्हणून आपल्या राजेपणाला अर्थ आहे. आम्हीच नस-लो तर राजेपण काय कामाचं!

छोट्या हत्तीचे विचार ऐकून महाराजांना खूप आश्चर्य वाटले. ते उभे राहिले. त्यांनी छोट्या हत्तीचे कौतुक केले आणि म्हणाले, माझ्या प्रजाजनहो, या छोट्याने धाडस केले. राजाला प्रश्न विचारले. त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून दिली. खरोखरच मीदेखील आता निर्णय घेतलाय. जंगलातल्या सर्व प्राण्या-पक्ष्यांना राहता येईल एवढी मोठी जागा आपल्याकडे आहे. आपण सगळ्यांनी तिथंच राहावं. तिथं आपल्या खाण्यापिण्याची सोय केलेली आहे. हे ऐकून साऱ्यांना खूप आनंद झाला. सगळ्यांनी महाराजांबरोबरच छोट्या हत्तीचेही आभार मानले. शेवटी राजा म्हणाला, माझ्या प्राणी मित्रांनो, आपण बोललं पाहिजे. कोणी कितीही मोठा असू द्या; राजा असो, मंत्री असो वा कोणी सरकारी अधिकारी त्याला आपण प्रश्न विचारले पाहिजेत. लोकशाही पद्धतीचा राज्यकारभार हेच तर आपल्या राज्याचे वैशिष्ट्य आहे. आपली नवी पिढी अधिक जागरूक आहे. ती प्रश्न विचारते याचा मला खूप आनंद आहे. छोट्या हत्तीच्या आईला आपल्या मुलाचा खूप खूप अभिमान वाटला.

# निवडणुकीच्या तोंडावर, नेते बोलू लागले विकासावर

जिल्हा परिषद, पंचायत समिती, महापालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतीच्या निवडणुका तोंडावर आल्या आल्या दक्षिण महाराष्ट्रातील राजकीय नेत्यांची भाषा विकासाची झाली आहे. कोल्हापुरात सतेज ऊर्फ बंटी पाटील यांनी सांगली, कोल्हापूर, साताऱ्याच्या विकासाचा विडा उचलत इथल्या व्यापाऱ्यांची, उद्योजकांची परिषद घेतली, तर सांगलीचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी उद्योगमंत्र्यांना हाताशी धरत सांगलीच्या विमानतळाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रत्येक मंगळवारी बैठक घेण्याचा आणि कार्गो विमानतळ लवकरच सुरू करण्याचा मनोदय व्यक्त केला आहे. नेत्यांना एकदमच विकासाची हुक्की आली आहे. एख-ादा मुद्दा तापवायचा म्हटला की त्याला कसे वारे घालायचे आणि कशी धग निर्माण करायची हे शिकायचे असेल तर दक्षिण महाराष्ट्रातील राजकीय नेतृत्वाकडून शिकावे. पूर्वीच्या काळी कोणत्याही निवडणुका आल्या की गावोगाव फक्त पांढऱ्या फक्कीच्या रेघा ओढलेल्या लोकांना दिसायच्या. नाही तर काही मंडळी रस्त्यावर मोजपट्टीने मापे घेत फिरत असलेली दिसायची. लोकांनी काय सुरू आहे असे उत्सुकतेपोटी विचारले, की एखाद्या मोठ्या प्रकल्पाचे किंवा रस्ता रुंदीकरणाचे नाव सांगून तेवढेच वातावरण केले जायचे. नंतर पुन्हा पाच वर्षे त्या आश्वासनाच्या पलीकडे काही व्हायचे नाही. नेत्यांची ही सवय आजही गेलेली नाही असे खेदाने म्हणावे लागते. दक्षिण महाराष्ट्रातील सातारा, कोल्हापूर आणि सांगली हे तीन जिल्हे नेहमीच राजकीय भूकंपाचे केंद्र राहिले आहे. गेल्या आठ दिवसांत येथे अतिवृष्टीच्या संकटाने शेतकऱ्यांना तडफडावे लागले, तर राजकीय नेत्यांनी मात्र या आपत्तीला सत्तेच्या खेळात रूपांतरित करण्याचा डाव रचला. भाजपची 'इशारा सभा' ते राष्ट्रवादीची रोख मदत, काँग्रेसची उपोषणे ते शिवसेनेची कर्जमाफीची मागणी-प्रत्येक घडामोडीत फक्त एकच सत्य दिसते : नेते शेतकऱ्यांच्या डोळ्यांतील अश्रूंचेही राजकारण करतात. सांगली जिल्ह्यातील अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे संसार उद्ध्वस्त झाले. पिकांचे मोठे नुकसान, रस्ते खराब, घरांची पडझड झाली.




पण, पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी मात्र १ ऑक्टोबरला जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेऊन फक्त कागदावरचे 'निर्देश' दिले. 'आठवडाभरात पंचनामे पूर्ण करा, दिवाळीपूर्वी भरपाई जमा होईल,' असा ढोल पिटला. पण प्रत्यक्षात? शेतकऱ्यांच्या खात्यात एक रुपयाही आलेला नाही. हे नेते फक्त फोटो सेशन करतात. शेतकऱ्यांच्या शेतात पाय ठेवण्याची हिंमत नाही. ३० सप्टेंबरला मंत्रालयात झालेल्या विमानतळ विकास बैठकीतही पाटील यांनी कवलापूर कार्गो विमानतळाच्या सर्वेक्षणाचे आदेश दिले. सांगलीचे आमदार सुधीर गाडगीळ, माजी मंत्री सुरेश खाडे, एकनाथ शिंदे यांच्या शिव-सेनेचे आमदार सुहासबाबत यांच्यासोबत अपक्ष खासदार विशाल पाटील आणि काँग्रेसचे आमदार विश्वजीत कदम यांनीही या बैठकीत सहभाग घेतला. शेतकरी जेव्हा वेगळ्या संकटात आहेत तेव्हा त्यावर काही करण्यापेक्षा विमानतळ विषयावर बैठक लावणे म्हणजे नेते फक्त हवाई बोलत आहेत. दुसऱ्याच दिवशी १ ऑक्टोबरला सांगलीत भाजपने आयोजित केलेली 'इशारा सभा' ही तर राजकीय नाटकाची पराकाष्ठा होती. चंद्रकांत पाटील, सुरेश खाडे, सत्यजीत देशमुख, सदाभाऊ खोत आणि मुख्य म्हणजे गोपीचंद पडळकर यांसारख्या नेत्यांनी 'महाराष्ट्राची राजकीय संस्कृती बिघडवणाऱ्यांना इशारा' दिला. सभेनंतर रावण दहन म्हणजे विरोधकांना विशेषकरून जयंत पाटील यांना 'रावण' म्हणून कॅरेक्टर असॅसिनेशन? ही सभा अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर झाली, पण शेतकऱ्यांच्या नुकसानीवर एक शब्द नाही. २ ऑक्टोबरला राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा परिषद व पंचायत समित्यांसाठी १३ ऑक्टोबरला सदस्य आरक्षण सोडत जाहीर केली. दहा नगरपालिकांच्या नगराध्यक्षपदासाठी कालच आरक्षण सोडत झाली. हे सर्व उमेदवारांच्या राजकीय बाजारात उत्साह आणेल, पण जनतेला फायदा काय? अतिवृष्टीग्रस्त भागात पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी ३ ऑक्टोबरला 'त्वरित पंचनामे' करण्याचे निर्देश दिले, पण प्रत्यक्षात प्रशासन अजूनही झोपेत आहे. शिवसेना (उबाठा)ने ३० सप्टेंबरला सरसकट कर्जमाफीची मागणी करत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. हे नेते शेतकऱ्यांच्या नावाने राजकारण करतात, पण कर्जमाफीसाठी एकही ठोस आंदोलन नाही. केवळ निवेदनाची औपचारिकता. कोल्हापूरमध्ये काँग्रेसने २७ सप्टेंबरला महापालिका निवडणुकीच्या तयारीसाठी आढावा बैठक घेतली. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, सतेज पाटील, जयंत आसगावकर यांनी रणनीती आखली. २८ सप्टेंबरला सतेज पाटील यांनी 'कोल्हापूर-सांगली-सातारा डेव्हलपमेंट कॉरिडॉर'ची संकल्पना मांडली. उद्योग, पर्यटन, तंत्रज्ञानावर चर्चा झाली, पण अतिवृष्टीच्या संकटात ही 'डेव्हलपमेंट' कशी शक्य आहे? आणि अचानकच का? वरिष्ठ पत्रकार, उद्योगपती यांसारख्या मान्यवरांनी भाग घेतला, पण हे कॉरिडॉर शेतकऱ्यांपर्यंत पोहोचेल का? अचानक निवडणुकीच्या हंगामात हा मुद्दा का आणला आहे याबद्दल कोणीही काही बोलले नाही. सत्याला समोरे जाण्याची कोणाचीही तयारी नाही हेच यातून दिसले. केवळ लोकानुनय आणि नेत्यांच्या भुलवण्याच्या कृतीला मूक संमती देण्याचे काम या मंडळींनी केले. त्यांनी हा मुद्दा आता काढला? असा किमान प्रश्न केला असता तरी आयोजकांना आपली भूमिका स्पष्ट करावी लागली असती.

विकास आपल्या गतीने सुरूच असतो. मात्र जेव्हा मदतीची गरज आहे तेव्हा 'विमानतळ आण-तो' आणि 'नवा कॅरिडॉर बांधतो' अशा घोषणांनी प्रत्यक्षात शेतकऱ्यांचे नुकसान भरून येणार नाही. भाजपची 'इशारा सभा' ही फक्त विरोधकांना धमकी देण्याचे साधन आहे, राष्ट्रवादीची साताऱ्यात केलेली रोख मदत हा प्रचाराचा डाव आहे, तर काँग्रेसची बैठक फक्त कागदावरची रणनीती आहे. हे स्टंट आता पुरे! शेतकऱ्यांच्या डोळ्यांतील अश्रू पुसा, नाहीतर

## डॉक्टर टीप्स

### पुरुषांमध्ये सेक्स इच्छा कमी असण्याचे हे ३ कारण जाणून घ्या...

प्रणयक्रिडा हा प्रत्येकाच्या आयुष्यातील महत्व-ाचा घटक असतो. यामुळे शरीर निरोगी राहण्यास मदत होते. तसेच मानसिक संतुलनही उत्तम राहते. पण, काही पुरूरुषांना ही इच्छा कमी असते. यामागे अनेक कारणे आहेत. या कारणांमुळेच पुरुषांना सेक्सचा आनंद लुटता येत नाही. याचे मुख्य कारण खाली देण्यात येत आहे.



**३) मांसपेशी कमकुवत असणे**

प्रणयाची इच्छा कमी होण्याचे आणखी एक मुख्य कारण म्हणजे डिस्फंक्शन म्हणजेच पुरूषाच्या गुप्तांगामधील मांसपेशी कमजोर असणे. मुख्यता या समस्येचा सामना व्हिटॅमिन सीच्या कमरतेमुळे, सिगरेटचे सेवन तसेच अल्कोहोलच्या सेवनामुळे होवू शकते. अनेक वेळा अति ताणामुळे देखील मांसपेशी कमजोर पडू शकतात. व्हिटॅमिन बी युक्त पदार्थांच्या कमरतेमुळे अनेक पुरूषांची प्रणयाची इच्छा कमी होते. आहारामध्ये व्हिटॅमिन बी युक्त पदार्थांचे सेवन वाढवल्यास ही समस्या दूर होते.

## विनोद




एक बाई शेजारणीच्या नवऱ्यास म्हणाली, 'तुम्ही आमच्या ह्यांना दारू प्यायला शिकवले नाही तर आमच्या ह्यांना सुपारीच्या खांडाचेसुद्धा व्यसन माहीत नव्हते' त्यावर त्या शेजारच्या बाईचा नवरा शांतपणे म्हणाला, 'बाई तुमचे म्हणणे खरं आहे. पण त्याला मी काय करणार? मला एकच गोष्ट माहीत आहे आणि ती म्हणजे जे जे आपणासी ठावे, ते ते दुसऱ्यासी शिकवावे.

## संदेश

jawani ke din chamkile ho gaye,
husn ke tevar nukeele ho gaye,
hum ijhar karne me thode dhele ho gaye,
aur udhar unke hath peele ho gaye!.

## सुविचार

स्वतंत्र असावे पण स्वै नसावे.




**संस्कृत सुभाषित**

**दृष्टिपूतं न्यसेत् पादं, वस्त्रपूत पिबेज्जलम्।।**
**सत्यपूतां वदेद् वाचं, मन:पूतं समाचरेत्।।**

अर्थ:-नीट पाहूनच जमिनीवर पाऊल ठेवावे, पाणी नेहमी वस्त्रातून गाळून घ्यावे, सत्याने पवित्र झालेले वचन बोलावे, मनाला जे पवित्र आणि सत्य वाटेल तसे वर्तन करावे.

# मनोरंजक महाशब्दकोडे

कोडे क्र.९



## आडवे शब्द

१. प्राचीन, जुने
४. चूकच्या विरुद्ध, सह
८. धुंदी
९. सन्मानाने केलेली पाठवणी
१०. पायापर्यंत लोंबणारा हार
१४. पद्धतीनुसार
१६. धनुष्याकृती
१७. उलटी, ओकारी
२०. हा अगरबत्तीचा असतो आणि पदार्थांतही
२१. संधी, मोका
२२. कमीत कमी, निदान
२५. खिसा गरम ठेवणाऱ्या
२६. गोरा ना काळा!
२७. धडक
२८. छोटी, लहानशी
३२. समोरासमोर
३५. शेवटचा पांडव
३८. स्वयंपाक करणारा
३९. मज्जाव
४०. भरभराट
४२. आवाज, गोंगाट
४३. छोटी विश्रांती
४४. समुदाय
४६. मजबूत, भक्कम
४८. आश्रय
४९. दुलई
५०. पराधीन असणारा जीव
५२. पदर
५४. पद्धत
५५. अभिनेता
५७. केसात माळण्याची फुलांची माळ
५९. आघात, घाव
६०. सुसर
६२. तपस्या
६४. नुकसान, घाटा
६६. शिक्षक
६७. सूर्याचे एक नाव
६८. अवघा
६९. छिद्रातून पडलेला उन्हाचा किरण
७१. पळसाचा डिंक
७३. आपले राष्ट्रगीत
७५. आणि
७६. इंग्रजीतला मुरांबा, मराठीत खूपच
७७. शेवट,७८. हार, सर
७९. नम्र

## उभे शब्द

१. पूजाअर्चा करणारा
२. एक हिंस्त्र प्राणी
३. बाज विणण्याची कापडी पट्टी
४. उद्यान, बाग
५. वस्तूंची यादी
६. झाडाची त्वचा
७. मालक, स्वामी
८. मऊ
११. स्वाभिमानी, बाणेदार
१२. भोजनालय
१३. अधाशी
१५. घोड्याचे घर
१६. आईसक्रीमचा एक प्रकार
१९. कापसाची बी
२०. मनातील इच्छा, आकांक्षा
२१. बोकड
२२. इंग्रजीत फाटक
२३. वडीलांचे मराठी संबोधन
२४. शत्रुच्या नाशाचे मंत्रतंत्र
२९. जेमतेम
३०. विशेष
३१. अरण्य
३२. विधिमंडळातील लोकप्रतिनिधी
३३. गजऱ्यातील सुगंधी वनस्पती
३४. प्रामाणिक
३६. मावळ्यांची युद्धातील घोषणा
३७. परमेश्वर
३८. जनगणना
४१. पसरट आकाराचे भांडे
४३. भव्य, प्रचंड
४५. खराब
४६. मीठी
४७. कोर्टातील दावा
५१. नम्रतेने मान खाली घालणे
५२. शिकार
५३. लोकनाट्य
५५. हात
५६. व्याकूळ, घाबरलेला
५८. उजाडण्यापूर्वीच
६१. उष्ण
६३. प्रसिद्ध
६५. चंद्रावर 'दिसणारा' प्राणी
६७. ठराविक पैसे
६८. माल, वस्तू
६९. पंकज
७०. टिमकी
७२. निरोप, सुट्टी
७४. लक्ष्मीचे एक नाव

## आडवे उत्तरे

१.पुरातन ४.बरोबर ८.नशा ९.रवानगी १०.कमलखानी हार १४.रीतसर १६.कमान १७.वमन २०.मसाला २१.अवसर २२.गोलबाजार २५.नोटा २६.उजळ २७.टक्कर २८.बारकी ३२.आमनेसामने ३५.सहदेव ३८.खानसामा ३९.मना ४०.बरकत ४२.रव ४३.विसावा ४४.समूह ४६.कणखर ४८.थारा ४९.रजई ५०.मानव ५२.पालव ५४.रीत ५५.कलाकार ५७.गजरा ५९.प्रहार ६०.मगर ६२.साधना ६४.तोटा ६६.मास्तर ६७.रवि ६८.सारा ६९.कवडसा ७१.कमरकस ७३.वंदेमातरम ७५.व ७६.जाम ७७.अंत ७८.माळ ७९.लीन

## उभे उत्तरे

१.पुजारी २.तरस ३.नवार ४.बगीचा ५.रकमाला ६.साल ७.धनी ८.नरम ११.मानी १२.खानावळ १३.हावरट १५.तबेला १६.कसाटा १९.सरकी २०.मनोकामना २१.अज २२.गेट २३.बाबा २४.जारणमारण २९.कसाबसा ३०.खास ३१.रान ३२.आमदार ३३.मरवा ३४.नेक ३६.हरहर महादेव ३७.देव ३८.खानेसुमारी ४१.तसराळे ४३.विशाल ४५.वाईट ४६.कव ४७.खटला ५१.नतमस्तक ५२.पारध ५३.वग ५५.कर ५६.कासविस ५८.रातोरात ६१.गरम ६३.नामवंत ६५.ससा ६७.रकम ६८.सामान ६९.कमळ ७०.डफली ७२.रजा ७४.रमा



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### साहिबजादा फरहान 'एके-४७' सेलिब्रेशनमुळे पुन्हा चर्चेत

मुंबई -आशिया चषक २०२५ स्पर्धेत भारतीय संघाने पाकिस्तानला ३ वेळा लोळवून जेतेपदाचा मान पटकावला होता. सुपर ४ फेरीत जेव्हा हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. त्यावेळी सामन्यादरम्यान बरंच काही घडलं होतं. या सामन्यात साहिबजादा फरहानने केलेलं सेलिब्रेशन तुफान चर्चेत राहिलं होतं. या सेलिब्रेशनमुळे आयसीसीने त्याच्यावर कारवाई देखील केली होती. पण अजूनही त्याला अद्दल घडलेली नाही. आता पुन्हा एकदा तो आपल्या वादग्रस्त सेलिब्रेशनमुळे चर्चेत आला आहे. नेमकं काय प्रकरण आहे? जाणून घ्या.
सुपर ४ फेरीत भारताविरुद्ध अर्धशतक झळकावल्यानंतर त्याने 'एके ४७' सेलिब्रेशन केलं होतं. त्या सेलिब्रेशनमुळे पाकिस्तानात त्याची क्रेझ वाढली आहे, असं त्याचं म्हणणं आहे. दरम्यान आता एका प्रॉडक्टची जाहिरात करण्यासाठी तो 'एके ४७' सेलिब्रेशन करताना दिसून आला आहे.

****

### ६ विकेट गेल्या तरी एकटी नडली, रुचा घोषची थरारक बॅटिंग, देशासाठी शतकाचा त्याग केला!

विशाखापट्टणम-महिला वर्ल्ड कपमध्ये रिचा घोषने टीम इंडियाला पुन्हा एकदा अडचणीतून बाहेर काढलं आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यात रिचा घोषने ७७ बॉलमध्ये ९४ रनची खेळी केली, ज्यात ११ फोर आणि ४ सिक्सचा समावेश होता. दक्षिण आफ्रिकेने या सामन्यात टॉस जिंकून पहिले बॉलिंगचा निर्णय घेतला, यानंतर भारताची अवस्था अत्यंत खराब झाली. १०२ रनवरच भारताने ६ विकेट गमावल्या होत्या, पण त्यानंतर रिचा घोषने आधी अमनजोत कौर आणि त्यानंतर स्नेह राणाला सोबत घेऊन किल्ला लढवला.



***

### २३ धावा करूनही स्मृती मंधानाने रचला इतिहास

विशाखापट्टणम-भारतीय संघाने आयसीसी महिला क्रिकेट वर्ल्डकप २०२५मध्ये आपला तिसरा सामना द. आफ्रिकेविरुद्ध खेळत आहे. या सामन्यात भारतीय चाहत्यांना सलामीवीर स्मृती मंधानाकडून मोठ्या खेळीची अपेक्षा होती. स्मृती २३ धावा करून बाद झाला. याआधी श्रीलंका आणि पाकिस्तानविरुद्ध स्मृतीने अनुक्रमे ८ आणि २३ धावा केल्या होत्या.दरम्यान, द. आफ्रिकेविरुद्ध स्मृती मंधानाने जरी छोटी खेळी केली असली तरी स्मृती मंधानाने नवा इतिहास रचला आहे.



***

### मुंबई क्रिकेट संघटनेची निवडणूक १२ नोव्हेंबरला

मुंबई-मुंबई क्रिकेट संघटनेने (एमसीए) पदाधिकारी, कार्यकारी परिषद सदस्य आणि ट्वेन्टी-२० मुंबई लीगच्या कार्यकारी परिषदेसाठीची निवडणूक १२ नोव्हेंबरला होणार असल्याचे गुरुवारी जाहीर केले. गेल्या वर्षी अमोल काळे यांच्या निधनानंतर 'एमसीए'चे अध्यक्षपद रिक्त झाले होते. या पदासाठी नंतर निवडणूक घेण्यात आली होती. यामध्ये अजिंक्य नाईक विजयी ठरले होते. त्यांनी या पदासाठी झालेल्या निवडणुकीत संजय नाईक यांना नमविले होते.नाईक यांची अध्यक्षपदी निवड झाल्याने रिक्त झालेल्या सचिवपदासाठी पुन्हा निवडणूक घेण्यात आली. यामध्ये अभय हडप निवडून आले. हडप यांनी सचिवपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर रिक्त झालेल्या कार्यकारी परिषदेच्या जागेसाठी पुन्हा निवडणूक झाली होती. यामध्ये सुरेंद्र हरमलकर यांनी दीपन मिस्त्री यांना नमविले होते.

***

### न्यूझीलंड संघासमोर बांगलादेशचे कडवे आव्हान; स्लग

दिल्ली-लय मिळविण्यासाठी झगडणाऱ्या न्यूझीलंड संघासमोर महिला एकदिवसीय विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या सामन्यात आज, शुक्रवारी बांगलादेशचे आव्हान असेल. न्यूझीलंडला सलग दोन लढतींत पराभव पत्करावा लागला आहे. दुसरीकडे, बांगलादेशचा संघ तीन सामन्यांत दुसऱ्या विजयासाठी प्रयत्नशील असेल.बांगलादेशच्या फिरकीपटूंनी आतापर्यंत चमक दाखवली आहे आणि गुवाहाटीच्या खेळपट्टीकडूनही त्यांना मदत मिळेल. बांगलादेशने सलामीच्या लढतीत पाकिस्तानला नमवले होते. त्यानंतर दुसऱ्या लढतीत त्यांना इंग्लंडकडून पराभव पत्करावा लागला. आता त्यांचे विजयी पुनरागमनाचे लक्ष्य असेल. फिरकी गोलंदाजी ही बांगलादेशची ताकद असून उपकर्णधार नाहिदा अख्तर, फाहिमा खातून आणि राबिया खान या न्यूझीलंडच्या फलंदाजांसमोर आव्हान उपस्थित करू शकतील.

## भारताला वेस्ट इंडिजविरुद्धच्यी कसोटी मालिका २-० ने जिंकण्याची संधी

नवी दिल्ली : पहिल्या कसोटीत वेस्ट इंडिजविरुद्ध भारतीय संघाने डावाने विजय मिळवला होता. आता टीम इंडिया आता दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर होणाऱ्या दुसऱ्या कसोटीसाठी पूर्णपणे सज्ज आहे. वेस्ट इंडिजविरुद्धच्या मोठ्या विजयानंतर संघाचे मनोबल उंचावले आहे. पण संघ संयोजनापेक्षा क्रिकेटपटूंचा थकवा आणि आगामी व्यस्त क्रिकेट वेळापत्रकावर अधिक लक्ष केंद्रित केले जाईल. दरम्यान, वेस्ट इंडिज संघ भारतापेक्षा खूपच कमकुवत आहे त्यामुळे भारताला ही कसोटी मालिका २-० ने जिंकण्याची नामी संधी आहे. भारताने २०२३ मध्ये दिल्लीच्या या मैदानावर ऑस्ट्रेलियाविरुद्ध शेवटचा कसोटी सामना खेळला होता. ही खेळपट्टी ऐतिहासिकदृष्ट्या फिरकी गोलंदाजांना पसंती देत आली आहे. ज्यामुळे वेगवान गोलंदाजांना मोठे स्पेल टाकण्याची गरज कमी पडणार आहे. टीम इंडियाने २००३ मध्ये खेळलेल्या सामन्यात तीन फिरकी गोलंदाज आणि दोन वेगवान गोलंदाज खेळवले आणि यावेळीही अशीच फिरकी-भारी



### फिरकीपटूंचा त्रिकूट मैदानात उतरवण्याची शक्यता

रणनीती वापरण्याची शक्यता आहे. भारत पुन्हा एकदा फिरकीपटूंचा त्रिकूट मैदानात उतरवण्याची शक्यता आहे. संघासमोरील सर्वात मोठी समस्या जसप्रीत बुमराहच्या कामाचा ताण आहे. आशिया कप अंतिम फेरीनंतर फक्त तीन दिवसांनी पहिली कसोटी खेळण्याबाबत प्रश्न उपस्थित झाले होते. पण त्याने कामगिरीत सातत्य दाखवले आहे. आता त्याला काही दिवसांची विश्रांती देण्यात आली आहे. तो ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या आगामी एकदिवसीय मालिकेत खेळणार नाही. या बाबी लक्षात घेता बुमराह खेळण्याची शक्यता आहे. पण दुखापतीमुळे दीर्घकाळ विश्रांती घेतल्यानंतर त्याचे कसोटी क्रिकेटमध्ये पुनरागमन अतिशय काळजीपूर्वक केले जात आहे. आणि संघ कोणताही धोका पत्करणार नाही. दुसरा पर्याय म्हणजे मोहम्मद सिराजला विश्रांती देणे. सिराज ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेचा भाग आहे आणि बुमराह एकदिवसीय सामन्यांमध्ये खेळणार नाही. भारताला तिन्ही सामन्यांसाठी सिराजला फिट राहिल याची काळजी घेणे आवश्यक आहे. जर रोटेशन प्लॅन लागू केला गेला आणि कोणत्याही प्रमुख वेगवान गोलंदाजाला विश्रांती दिली गेली. तर तरुण वेगवान गोलंदाज प्रसिद्ध कृष्णाला संधी मिळू शकते. जर त्याला संधी मिळाली तर त्याचा हा मायदेशातील पहिलाच कसोटी सामना ठरेल.

## भारताचा दक्षिण आफ्रिकेकडून पराभव

### फएक चूक टीम इंडियाला महागात पडली! घोषच्या ९४ धावांवर पाणी

**नवी दिल्ली:** ऋचा घोषने केलेल्या ९४ धावांच्या शानदार खेळीमुळे भारतीय संघाने २५१ धावांचे आव्हान उभे केले होते. या धावांचा बचाव करताना भारतीय गोलंदाजांनी पुनरागमन केले खरे, मात्र अखेरीस डी क्लार्क (नाबाद ८४) आणि क्लो ट्रायॉन (४९) यांच्या निर्णायक खेळीमुळे दक्षिण आफ्रिकेने ४९ व्या षटकात हा लक्ष्य पूर्ण केले.
भारत आणि दक्षिण आफ्रिका मजा संघांमध्ये अटीतटीचा सामना रंगला. या सामन्यात भारतीय संघाला फलंदाजीत हवी तशी सुरुवात करता आली नव्हती. पण ऋचा घोषच्या ९४ धावांच्या दमदार खेळीच्या बळावर भारतीय संघाने २५१ धावांपर्यंत मजल मारली. या धावांचा बचाव करताना भारतीय गोलंदाजांनी पूर्ण जोर लावला. पण क्लार्कने नाबाद ८४ आणि ट्रायॉनने ४९ धावांची खेळी करत भारतीय संघावर ३ गडी राखून विजय मिळवला.
या सामन्यात दक्षिण आफ्रिकेला विजयासाठी २५२ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेला पहिल्याच षटकात मोठा धक्का बसला. तजमीन ब्रिट्सब शून्यावर माघारी परतली. पण दुसऱ्या बाजूने कर्णधार लॉरा वोल्वार्ड्टने भारतीय गोलंदाजांचा चांगलाच समाचार घेतला. तिने सलामीला फलंदाजी करताना १११ चेंडूंचा सामना करत ७० धावांची खेळी केली. पण त्यानंतर भारतीय गोलंदाजांनी पुनरागमन केलं आणि दक्षिण आफ्रिकेचे फलंदाज संघर्ष करताना दिसून आले.





तखऊएज: कोच गंभीरच्या घरी फक्त भारतीय कसोटी संघासाठी असलेल्या डिनर पार्टीला हर्षित राणाची हजेरी, ऐटीत घेतली एन्ट्री
सुने लुस अवघ्या ५ धावांवर माघारी परतली. तर मॅरीजॅन कॅपने २०, अँनेके बॉशने १, सिनालो जाफ्ताने १४ धावांची खेळी केली. शेवटी क्लो ट्रायॉनने ४९ धावांची खेळी केली. ट्रायॉनने दक्षिण आफ्रिकेला विजयाच्या अगदी जवळ पोहोचवलं होतं, पण स्नेह राणाने तिला बाद करत माघारी धाडलं.
ट्रायॉन बाद होऊन माघारी परतली, पण डी क्लार्कने मोठे फटके खेळून दक्षिण आफ्रिकेला सामन्यात टिकवून ठेवलं. ४९ व्या षटकात २ षटकार मारून तिने दक्षिण आफ्रिकेला हा सामना जिंकून दिला.
भारतीय संघाकडून ८ व्या क्रमांकावर फलंदाजी करताना ऋचा घोषने ९४ धावांची खेळी केली. तर दक्षिण आफ्रिकेकडून ८ व्या क्रमांकावर फलंदाजी करताना क्लार्कने नाबाद ८४ धावांची खेळी करत दक्षिण आफ्रिकेला विजय मिळवून दिला.
शेवटच्या ४ षटकात तर भारतीय संघाला विजयाची सुवर्णसंधी होती. शेवटच्या २४ चेंडूत दक्षिण आफ्रिकेला विजयासाठी ४१ धावांची गरज होती. त्यावेळी भारतीय संघाकडून ४७ वे षटक टाकण्यासाठी क्रांती गौड गोलंदाजीला आली होती. त्यावेळी क्लार्क स्ट्राईकवर होती. क्लार्कने लागोपाठ २ षटकार आणि १ चौकार मारला. या षटकातील पहिला चेंडू तिने वाईड चेंडू टाकला होता. या षटकात दक्षिण आफ्रिकेने १८ धावा वसूल केल्या. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेने सामन्यात पुनरागमन केलं. पुढील १८ चेंडूत दक्षिण आफ्रिकेला अवघ्या २३ धावा करायच्या होत्या. दक्षिण आफ्रिकेकडून क्लार्कने ४९ व्या षटकात २ षटकार मारून सामना आपल्या नावावर केला.

## रशीद खानचा मोठा कारनामा

अबुधाबी-अफगाणिस्तान आणि बांगलादेश क्रिकेट संघातील तीन सामन्यांच्या वनडे मालिकेला ८ ऑक्टोबर रोजी सुरुवात झाली. मालिकेतील पहिला सामना अबुधाबी इथं खेळला गेला. या सामन्यात अफगाणिस्तानचा स्टार लेग-स्पिनर रशीद खाननं गोलंदाजीत उल्लेखनीय कामगिरी केली. नाणेफेक जिंकल्यानंतर प्रथम फलंदाजी करणाऱ्या बांगलादेशच्या डावात रशीदनं तीन बळी घेतले. यासह रशीद खाननं एक नवा विक्रम आपल्या नावावर केला.
पहिला आशियाई गोलंदाज : रशीद खान सध्या मर्यादित षटकांच्या क्रिकेटमध्ये दिग्गज गोलंदाज मानला जातो, त्यानं वनडे आणि टी-२० दोन्हीमध्ये प्रभावी कामगिरी केली आहे. बांगलादेशविरुद्धच्या पहिल्या वनडे सामन्यात रशीद खाननं २००वा बळी घेतल्यानं, तो टी-२० आणि वनडे सामन्यात हा पराक्रम करणारा पहिला आशियाई गोलंदाज ठरला. न्यूझीलंडचा माजी खेळाडू टिम साउथीनंतर रशीद खान हा जागतिक क्रिकेटमध्ये हा पराक्रम करणारा दुसरा खेळाडू आहे.
सर्वात कमी सामन्यांमध्ये २०० वनडे बळी घेणारा दुसरा फिरकी गोलंदाज : बांगलादेशविरुद्धच्या पहिल्या वनडे सामन्यात रशीद खाननं १० षटकांत ३८ धावा देत तीन विकेट्स घेतल्या. यामुळं तो वनडे क्रिकेट इतिहासात सर्वात कमी सामन्यात २०० विकेट्स गाठणारा दुसरा फिरकी गोलंदाज ठरला. रशीदनं ११५ सामन्यांमध्ये ही कामगिरी केली आणि अनिल कुंबळे, शेन वॉर्न आणि आदिल रशीद यांना मागे टाकले. या यादीत पाकिस्तानचा माजी फिरकी गोलंदाज सकलेन मुश्ताक अव्वल आहे, ज्यानं फक्त १०४ सामन्यांमध्ये २०० वनडे विकेट्स गाठल्या.



वनडे क्रिकेटमध्ये सर्वात कमी सामन्यांमध्ये २०० बळी घेणारे फिरकी गोलंदाज :सकलेन मुश्ताक (पाकिस्तान) : १०४ सामनेराशिद खान (अफगाणिस्तान) : ११५ सामनेशेन वॉर्न (ऑस्ट्रेलिया) : १२५ सामनेआदिल रशीद (इंग्लंड) : १३७ सामनेअनिल कुंबळे (भारत) : १४७ सामने
अफगाणिस्तानने जिंकला सामना : बांगलादेशने अफगाणिस्तानला २२२ धावांचे लक्ष्य ठेवले होते. अफगाणिस्तानने हे लक्ष्य ४७.१ षटकांत ५ गडी गमावून २२६ धावा करुन सामना जिंकला. अफगाणिस्तानकडून सलामीवीर रहमानउल्लाह गुरबाजने ५० धावा केल्या, तर रहमत शाहनेही ५० धावांचे योगदान दिले. कर्णधार हशमतुल्लाह शाहिदीने ३३ धावा केल्या. बांगलादेशकडून हसन महमूदने सर्वाधिक ४ बळी घेतले.

## शुभमनला आधीच माहिती होते रोहित शर्माची कॅप्टन्सी जाणार

दिल्ली-ऑस्ट्रेलिया दौऱ्यापूर्वी शुभमन गिलला टीम इंडियाचा एकदिवसीय कर्णधार म्हणून नियुक्त करण्यात आल्यापासून आणि रोहित शर्माला कर्णधारपदावरून काढून टाकण्यात आलं आहे. बीसीसीआयने अहमदाबाद कसोटी सामन्याच्या तिसऱ्या दिवशी याची घोषणा केली. मात्र, तोपर्यंत टीम इंडियाने वेस्ट इंडिजविरुद्धचा कसोटी सामना खिशात घातला होता. अशातच आता दिल्ली टेस्टपूर्वी शुभमन गिलने मोठे वक्तव्य केले आहे.मला आधीच माहिती मिळाली होती - शुभमन कसोटी सामन्याच्या मध्यभागीच याची घोषणा करण्यात आली होती, पण मला त्याआधीच थोडी माहिती मिळाली होती, असं शुभमन गिल म्हणाला. त्यामुळे त्याला रोहित शर्माची कॅप्टन्सी जाणार याची माहिती देखील होती. शुभमन पु.ढे म्हणतो, अर्थातच ही एक मोठी जबाबदारी आणि त्याहूनही मोठा सन्मान आहे. त्या फॉरमॅटमध्ये माझ्या देशाचे नेतृत्व करण्यास मी खूप उत्सुक आहे. आणि हो, गेल्या काही महिन्यांपासून माझ्यासाठी खूप रोमांचक आहे,फ्फ असं शुभमन गिल गुरुवारी पत्रकार परिषदेत म्हणालेय.स्वत:ला सिद्ध करण्यास उत्सुक मी क्रिकेटच्या तिन्ही फॉरमॅटमध्ये स्वत:ला सिद्ध करण्यास आणि शक्य ते सर्व जिंकण्यास उत्सुक आहे, असं काही महिन्यांपूर्वी भारताच्या कसोटी कर्णधार म्हणून आपल्या कारकिर्दीची सुरुवात करणाऱ्या गिलने म्हटलं आहे.

## टीम इंडिया हे नाव वापरण्यापासून बीसीसीआयला रोखा

### दिल्ली उच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेवर मोठा निर्णय



मुंबई -भारतीय क्रिकेट संघ हा बीसीसीआयचा की भारताचा? अशी चर्चा अधूनमधून होत राहते. कट्ट्यावर क्रिकेट चाहत्यांमध्ये होणारी चर्चा थेट दिल्ली उच्च न्यायालयात पोहोचली. भारताच्या क्रिकेट संघाला टीम इंडिया म्हणण्यापासून रोखण्यात यावे, अशी याचिका बीसीसीआयच्या विरोधात दाखल करण्यात आली. वकील रीपक कंसल यांनी सदर जनहित याचिका दाखल केली होती. मात्र दिल्ली उच्च न्यायालयाने सदर याचिका फेटाळून लावली.वकील रिपक कंसल यांनी म्हटले की, बीसीसीआय ही खासगी संस्था आहे. तसेच भारत सरकारने त्यांच्या क्रिकेट संघाला टीम इंडिया म्हणून संबोधण्यास परवानगी दिलेली नाही. मात्र न्यायालयाने सदर याचिका वेळेचा अपव्यय असल्याची टिप्पणी करत याचिका धुडकावून लावली.दिल्ली उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश डीके उपाध्याय आणि न्यायमूर्ती तुषार राव गेडेला यांच्या खंडपीठाने याचिकाकर्ते कंसल यांना चांगलेच खडसावले. ते म्हणाले, हा न्यायालयाचा आणि तुमच्या वेळेचा निव्वळ अपव्यय आहे.भारतीय क्रिकेट संघाचे अधिकृतरित्या प्रतिनिधित्व करतो, असा चुकीचा आभास बीसीसीआयकडून निर्माण केला जातो, असा आरोप याचिकेत करण्यात आला होता. ''प्रसार भारतीसारखे मंच जसे की, दूरदर्शन आणि ऑल इंडिया रेडिओ हे बीसीसीआयच्या संघाला टीम इंडिया किंवा भारताचा क्रिकेट संघ म्हणून संबोधतात. तसेच क्रिकेट स्पर्धेत भारताचा ध्वज वापरून खासगी संस्थेला अप्रत्यक्षपणे राष्ट्रीय दर्जा दिला जात आहे. ज्यामुळे लोकांच्या मनात चुकीचा समज निर्माण होतो. यामुळे खासगी संस्थेला व्यावसायिक वैधता मिळते'', असे याचिकाकर्त्याने याचिकेत म्हटले आहे.
तथापि, उच्च न्यायालयाने याचिकाकर्त्याला खडे बोल सुनावले. जागतिक पातळीवर क्रीडा क्षेत्राचे कार्य कसे चालते? याची माहिती करून घेण्याची सूचना न्यायालयाने केली. कोणत्याही राज्याचा हस्तक्षेप होऊ नये, यासाठी क्रीडा संघाची स्वतंत्र यंत्रणा असते, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

## क्रिकेटपटू रिंकू सिंहला डी-कंपनीकडून धमकी; दोन आरोपींना अटक

मुंबई-बॉलिवूडनंतर आता अंडरवर्ल्डचे सावट क्रिकेट जगतावरही दिसून येत आहे. टीम इंडियाचा क्रिकेटपटू रिंकू सिंहला दाऊद इब्राहिमच्या डी-कंपनीकडून धमकी मिळाल्याचे समोर आलेय. याप्रकरणी मुंबई गुन्हे शाखेने धडक कारवाई करत दोन आरोपींना अटक केली आहे. मात्र या प्रकरणामुळे क्रीडाविश्वात एकच खळबळ उडाली आहे.
नेमके प्ररकरण काय : क्रिकेटपटू रिंकू सिंहला ५ कोटी रुपयांची खंडणी मागितली गेली होती. रिंकूच्या मोबाईलवर ५ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ७:५७ वाजता धमकीचा पहिला संदेश आला होता. त्यात लिहिले होते की, ''आशा आहे तुम्ही ठीक असाल. मी तुमचा सर्वात मोठा चाहता आहे आणि मला आनंद आहे की तुम्ही केकेआर संघाकडून आयपीएल खेळता. रिंकू सर, मला खात्री आहे की एक दिवस तुम्ही कारकिर्दीच्या शिखरावर पोहोचाल. साहेब, एक विनंती जर तुम्ही थोडी आर्थिक मदत करु शकलात, तर अल्लाह तुम्हाला आणखी बरकत देईल, इंशाअल्लाह.'' रिंकूनं या संदेशाला फारसं महत्व न देता कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही. त्यानंतर ९ एप्रिल २०२५ रोजी रात्री ११:५६ वाजता रिंकू सिंगला दुसरा संदेश आला. ''मला ५ कोटी रुपये हवेत. वेळ आणि ठिकाण मी ठरवीन.'' या दुसऱ्या धमकीच्या मेसजलाही रिंकूनं उत्तर दिलं नाही. त्यानंतर २० एप्रिलला सकाळी ७:४१ वाजता इंग्रजीत आणखी एक संदेश आला की, 'ठशाळपवशी! ऊ-ोरिपू.'
खंडणीचं बाबा सिद्धिकींच्या केससोबत कनेक्शन : दिवंगत एनसीपी नेते आणि माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांचे पूत्र तथा माजी आमदार झिशान सिद्दीकी यांना धमकी देणारा आरोपी मोहम्मद दिलशाद नौशादनंच रिंकूला धमकी दिल्याचे स्पष्ट झाले आहे. या दोन्ही प्रकरणात नौशादने दाखल करण्यात आला होता. आधी



स्वत:ला डी-कंपनीशी जोडून धमकी देत खंडणी मागितली होती. नौशाद हा मूळचा बिहारमधील दरभंगा जिल्ह्याचा रहिवासी असून २८ एप्रिल रोजी त्याच्याविरुद्ध गुन्हा त्याला लुकआउट नोटीस (डजउ) बजावण्यात आली आणि त्यानंतर त्याच्याविरोधात रेड कॉर्नर नोटीसही जारी झाली होती. त्यानंतर अखेर कॅरेबियन बेटांवर तो असल्याची माहिती मिळताच, त्रिनिदाद आणि टोबॅगोहून त्याचे भारतात प्रत्यार्पण करण्यात आले.
मुंबई पोलिसांकडून अधिक तपास सुरु : गुन्हे शाखेच्या दाव्यानुसार फेब्रुवारी ते एप्रिल २०२५ दरम्यान अंडरवर्ल्डकडून रिंकू सिंह आणि त्याच्या टीमला धमकीचे तीन संदेश पाठवण्यात आले आहे. या धमक्यांमधून रिंकूकडून ५ कोटी रुपयांची खंडणी मागण्यात आली होती. मुंबई पोलिसांकडून या प्रकरणाची चौकशी सुरु करण्यात आली असून यात तात्काळ कारवाई करत दोन आरोपींना अटक केली आहे. हे दोन्ही आरोपी दाऊद इब्राहिमशी संबंधित असल्याचे समोर आले असून या खंडणीमागील खरा सूत्रधार कोण? आहे याचा तपास सध्या सुरु आहे.
चौकार मारत जिंकवला आशिया चषक : रिंकू सिंह हा टीम इंडियातील एक फिनिशर क्रिकेटपटू आहे. नुकत्याच पार पडलेल्या आशिया चषकात केवळ एक बॉल खेळणं त्याच्या वाट्याला आलं होतं. त्यावर त्यानं विजयी चौकार मारुन आशिया चषकाच्या अंतिम सामन्यात पाकिस्तानविरुद्ध भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केलं. आयपीएलमध्ये रिंकू शाहरुख खानच्या केकेआरचं प्रतिनिधीत्व करतो. रिंकूचं लग्न जौनपूरमधील मछलीशहर लोकसभा मतदारसंघातील खासदार प्रिया सरोजशी ठरलं आहे. नुकताच या दोघांचा साखरपुडा पार पडला. प्रिया ही समाजवादी पार्टीची खासदार असून आणि तिचे वडील अनेक वर्ष आमदार राहिले होते.

# प्रभाग ०३ मधील अतिवृष्टी ग्रस्तांना सरसकट विनाअट शासकीय मदत मंजूर करा

## राष्ट्रवादी किसान सभेने तहसीलदारांना माजी मंत्री मा. आमदार संजय बनसोडे यांचे दिले पत्र

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहरातील प्रभाग क्रमांक ०३ मधील मागासलेला भाग असल्याने येथील रहिवाशांची घरे मजबूत नसल्याने पाऊसाचे पाणी घरात शिरते यातच सप्टेंबर महिन्यात ढगफुटी सदृश्य पाऊस पडल्याने नागरिकांचे खूप मोठे नुकसान झाले आहे. घरात पाणी शिरल्याने सर्व संसार उपयोगी वस्तू आणि राशन पाण्यात भिजल्याने जीवन जगणे कठीण झाल्याने राष्ट्रवादी किसान सभेने माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांना निवेदन दिल्याने संजय बनसोडे यांनी तहसीलदारांना सरसकट नुकसान भरपाई देण्यात यावे म्हणून पत्र देण्यात आले.

राष्ट्रवादी किसान सभा अध्यक्ष राहुल बनसोडे यांच्या नेतृत्वात आज गुरुवार दिनांक ९ ऑक्टोबर २०२५ रोजी तहसीलदार सौदागर तांदळे यांची भेट घेऊन चर्चा करून त्यांना निवेदन देण्यात आले.



शहरातील पूर्व भागात मागासलेल्या मोठ्या वस्तीतील या भागात राहणारे सर्व नागरिक हे अतिशय गरीब असून मोलमजुरी करून खाणारा कामगार वर्ग मोठ्या प्रमाणात आहे. मे महिन्यात सुरू झालेला पाऊस हा सप्टेंबर महिन्यात मोठ्या प्रमाणात वाढल्याने गेल्या काही दिवसापासून ढगफुटी सदृश्य अतिवृष्टी झाल्याने समस्त लातूर जिल्हा व शहरामध्ये विशेष करून पूर्व भागातील प्रभाग क्र. ०३ मध्ये इंदिरानगर, साठे नगर, जय भीम नगर, राजीव नगर, संत गोरोबा सोसायटी, वैभव सोसायटी, यशवंत भैय्या नगर, आनंद नगर, महात्मा गांधी कुष्ठधाम वस्ती, बालाजी नगर, तुळजाभवानी नगर (भोई वाडा), करीम नगर, प्रबुध्द नगर, म्हसोबा नगर, पंचवटी नगर या संपूर्ण परिसरामध्ये पावसाचे पाणी घरात शिरून तसेच घरांचे छताला गळती लागून तर कोणाचे या पावसात पत्रे उडून गेल्याने किंवा पावसाचे पाणी गळत असल्याने संपूर्ण घरामध्ये पाणी च पाणी साचले असल्याने घरातील संसार उपयोगी साहित्य, राशन पाण्यात भिजल्याने, जेवण राहणे व झोपण्याची व्यवस्था अतिशय दयनीय झाली असून येथील नागरिकांना जीवन जगण्यासाठी कसरत करावी लागत आहे तसेच प्रभाग क्रमांक ०३ मधील जागा गायरान असल्याने येथील नागरिकांकडे कसल्याही प्रकारचा मालकी हक्क म्हणून कोणतेही कबाले, ८ - अ उतारे, मालकी हक्क उपलब्ध नसून यांना घरकुल अथवा कोणतेही शासकीय अनुदान घेता येत नसल्याने तसेच येथील नागरिक गेल्या २५ ते ३० वर्षापासून येथे कच्चे घर करून रहिवास करत असून यांनी प्रशासनाकडे अनेक वेळा दाद मागूनही त्यांना प्रशासनाने आज पर्यंत मालकी हक्क म्हणून कोणताही कागद दिला नसल्याने हे या भागातील खरे अतिवृष्टीग्रस्त असल्याने यांना आज घडीला प्रशासनाच्या मदतीची गरज भासत असल्याने येथील नागरिकांच्या बैठकीतून या भागातील राष्ट्रवादी किसान सभेचे अध्यक्ष राहुल बनसोडे यांच्याशी चर्चा करून यांच्याच नेतृत्वात माननीय आमदार संजय बनसोडे यांना निवेदन देण्यात आल्याने त्यांच्या निवेदनावरून आमदार संजय बनसोडे यांनी तहसीलदारांना सरसकट नुकसान भरपाई द्यावी म्हणून पत्र काढून राष्ट्रवादी किसान सभेच्या वतीने आज गुरुवार दिनांक ९ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रभाग क्रमांक ०३ मधील अतिवृष्टी ग्रस्तांना विनाअट सरसकट नुकसान भरपाई तात्काळ देण्यात यावी म्हणून लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे यांची त्यांच्या दालनात भेट घेऊन तहसीलदारांशी सविस्तर चर्चा करून निवेदन देण्यात आले.

यावेळी राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते मकरंद सावे, प्रशांत पाटील किसान सभेचे जिल्हा अध्यक्ष राहुल बनसोडे, संतोष उपाडे, प्रणिती सुर्यवंशी, प्रा. अमर वाघमारे, प्रविण थोरात, खमर काजी, राजकिरण सुर्यवंशी, जाहागीर शेख, दिनेश काबळे, कबीर शेख, हेमंत जाधव, सचिन मेटे, ज्ञानेश्वर पाटील, अविनाश राठोड, राजेश खटके, राहुल काबळे, रमाकांत कसबे, काशीनाथ गव्हाणेसह इतर कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दयानंद वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयात कम्प्युटर लर्निंग कोर्स सेमिनारचे आयोजन



**लातूर/प्रतिनिधी :** दि.०८ ऑक्टोबर रोजी दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी कम्प्युटर लर्निंग कोर्स


सेमिनार चे आयोजन दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर दयानंद वाणिज्य महाविद्यालय,लातूर. प्रा.ऋतुजा देशमुख ,प्रशासकीय अधिकारी,समन्वयक डॉ. सुभाष मोरे ,द. वा. कनिष्ठ महाविद्यालय तसेच प्रमुख मार्गदर्शक मा. श्री. अमर भुत्ते एम.के.सी.एल मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह उपस्थित होते.या कार्यक्रमाच्या प्रस्तावनेत डॉ.सुभाष मोरे यांनी च्या युगात कम्प्युटर ज्ञान अद्यावत करून विविध व्यावसायिक ऑनलाईन व ऑफलाईन कोर्स साठी प्रवेश घ्यावा असे सांगितले तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी क्षेत्रात नवनवीन बदल होत आहेत त्या बदलाला जाणून विद्यार्थ्यांनी देखील स्वतःला डिजिटल शिक्षणाच्या दुनियेत अपडेट करावे असे सांगितले.

तसेच प्रमुख मार्गदर्शक मा. श्री. अमर भुत्ते यांनी एम.के. सी.एल .मार्फत चालवल्या जाणाऱ्या विविध कोर्स विषयी तसेच कम्प्युटरमध्ये आपले चांगले भवितव्य कसे घडवता येईल याबाबत सखोल माहिती दिली. तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.रेणुका महाळंगीकर यांनी केले.या कार्यक्रमासाठी उत्स्फूर्तपणे विद्यार्थी सहभागी होते. तसेच कार्यक्रमासाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारीही उपस्थित होते.

## जयक्रांती महाविद्यालयास मैदानी स्पर्धेत सातव्यांदा जनरल चॅम्पियनशिप

**लातूर/प्रतिनिधी :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतर महाविद्यालयीन अ विभागीय ऍथलेटिक्स क्रीडा स्पर्धा दिनांक ०७ व ०८ आक्टोंबर २०२५ या संत तुकाराम नॅशनल मॉडेल स्कूलच्या मैदानावर पार पडल्या. या स्पर्धेमध्ये खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन करत जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालयातील मुलांनी ४४ गुण तर मुलींनी ३४ गुण प्राप्त करून सलग सातव्यांदा जनरल चॅम्पियनशिप ची ट्रॉफी पटकाविली आहे. मुलांची जनरल चॅम्पियनशिप व मुले व मुली मिळून जनरल चॅम्पियनशिप अशा दोन जनरल चॅम्पियनशिपच्या ट्रॉफीज महाविद्यालयाने पटकाविल्या आहेत. या संघामध्ये आकाश थोरात, पंकज भोसेकर, परशुराम कुऱ्हाडे, आदित्य पवार, दिपक जाधव, संदीप आडे, मंगेश चव्हाण, सागर सोनवणे, कृष्णा राठोड, परमेश्वर घोगरे, ऋषिकेश कांबळे, कु. भाग्यश्री सूर्यवंशी, कु. पल्लवी पवार, कु. आरती साळुंखे, कु. स्वाती पटनुरे, कु. मयुरी जोशी या खेळाडूंना क्रीडा विभाग प्रमुख, प्रा. डॉ. राजेश कारंजकर, प्रा. शिवराज बाजुळगे यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल संस्थेचे सचिव प्रा. गोविंदराव घार, अध्यक्ष बालाजीराव घार, संस्थेचे सदस्य तथा प्राचार्य प्रशांतजी घार, प्राचार्य प्रो. डॉ. श्रीधर कोल्हे , पवन घार, अजित घार, महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन केले आहे.

## शिवलिंगेश्वर फार्मसी चे आविष्कार स्पर्धेत घवघवीत यश



**औसा/प्रतिनिधी :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने दयानंद वाणिज्य महाविद्यालय लातूर येथे आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय आविष्कार स्पर्धेत शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी, आलमला, ता. औसा, जि. लातूर फार्मसीच्या विध्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करून महाविद्यालया चे नाव लौकिक वाढविले.

या स्पर्धेत लातूर परिसरातील विविध महाविद्यालयांतील पदवी, पदव्युत्तर पदवी आणि पोस्ट पदव्युत्तर पदवी स्तरावरील विध्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विध्यार्थ्यांनी नाविन्यपूर्ण संशोधन संकल्पना मांडून आपली सर्जनशीलता व संशोधन वृत्ती प्रदर्शित केली.

स्पर्धेत मानवशास्त्र, भाषा आणि ललित कला या विभागात पोस्ट पदव्युत्तर पदवी स्तरावर काबरा विनय यांनी प्रथम तर गौतम दुर्गम यांनी तृतीय क्रमांक पटकावला. आकांक्षा जाधव प्रथम तर वैभव गबाळे यांनी वाणिज्य, व्यवस्थापन आणि कायदा विभागात पोस्ट पदव्युत्तर पदवी स्तरावर द्वितीय क्रमांक पटकावला.

पदव्युत्तर पदवी स्तरावरील गटात अतिका पठाण हिने शुद्ध विज्ञान या विभागात तृतीय क्रमांक मिळवला. तसेच संजना गुप्ता हिने अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान विभागात पदव्युत्तर स्तरावर प्रथम क्रमांक पटकावला, तर खुल्लोड कुरेशी हिने द्वितीय क्रमांक मिळवला.

सदरील विद्यार्थ्यांना कविता सिरगीरे, डॉ. सचिन कुलकर्णी, डॉ. अशोक गिरी, डॉ. प्रसाद कटारे व समन्वयक विद्या कापसे (येलम) या प्राध्यापकांनी मार्गदर्शन केले होते.

संस्थेचे अध्यक्ष शिवचरण धाराशिवे, उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, सचिव बसवराज धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे, डॉ. कैलास कापसे, प्रशासकीय अधिकारी ॲड. योगेश धाराशिवे, विभाग प्रमुख डॉ. समीर शफी, डॉ. अजय फुगटे, डॉ. सुरज मालपाणी, दिनेश गुजराती व सर्व प्राध्यापक, कर्मचाऱ्यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## सार्वजनिक ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांच्या मोर्चासंदर्भात जिल्हा ग्रंथालय अधिकाऱ्यांमार्फत शासनाला निवेदन सादर

**लातूर/प्रतिनिधी :** राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी येत्या दि. ११ डिसेंबर २०२५ रोजी नागपूर विधान भवनावर भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चाचे निवेदन गुरुवारी लातूर जिल्हा ग्रंथालय अधिकाऱ्यांमार्फत शासन - प्रशासनाकडे सादर करण्यात आले.

लातूरच्या जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर यांच्याकडे हे निवेदन सुपूर्द करण्यात आले. यावेळी जिल्हा ग्रंथालय कार्यालयातील सुधीर आचार्य, हिरालाल पाटील यांचीही उपस्थिती होती. ग्रंथालय अधिनियम १९६७ मध्ये काल सुसंगत सुधारणा करण्यात यावी. ग्रंथालय कर्मचारी यांचे काम सहा तास ऐवजी आठ तास करण्यात यावे. ग्रंथालय अधिनियम १९६७ मध्ये सार्वजनिक ग्रंथालयांतील कर्मचारी यांना शैक्षणिक पात्रतेनुसार वेतनश्रेणी लागू करावी व किमान वेतन दरमहा त्यांच्या खात्यावर जमा करण्यात यावे. शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या प्रमाणे शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयातील कर्मचारी यांना सेवाशर्ती नियमावली लागू करण्यात यावी. ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या वेतनात दरवर्षी १० टक्के वाढ करण्यात यावी. विमा हॉस्पिटलच्या माध्यमातून ग्रंथालय कर्मचारीऱ्यांना वैद्यकीय सेवेचा लाभ देण्यात यावा. ग्रंथालय कर्मचाऱ्यांना असंघटित कामगारांचा दर्जा देण्यात यावा. सार्वजनिक ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर सन्मानाने जगता यावे यासाठी निवृत्तीवेतन देण्यात यावे. ४० टक्के अनुदान वाढीचा शासन निर्णय लवकरात लवकर काढण्यात यावा.ग्रंथालयाचा दर्जा / व र्ग बदलचा आदेश काढण्यात यावा आदी मागण्यांसाठी हा मोर्चा काढण्यात येणार आहे.

या निवेदनावर महाराष्ट्र राज्य सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे प्रमुख संघटक विद्यासागर हणमंते, मराठवाडा विभाग उपाध्यक्ष नवनाथ शिंदे, कोषाध्यक्ष मनोहर गायकवाड, विकास परिषदेचे जिल्हाध्यक्ष श्रीधर स्वामी, उपाध्यक्ष सूर्यकांत जाधव, वैशाली दुरुगकर , कार्याध्यक्ष चंद्रशेखर ढगे , सचिव संतोष करमले, सहसचिव गुप्तलिंग स्वामी, नागेश्वरी पांचाळ, खजिनदार विद्यासागर गायकवाड, शिवाजी महामुनी, सूर्यकांत जगताप, शिवहार बिरादार, योगेश भंडारपे , दगडू गरड , किशोरचंद देशमाने, अरविंद उबाळे, सय्यद नबी, सोपान सूर्यवंशी, निवृत्ती सूर्यवंशी, मंगल बावगे, साहेबराव गायकवाड, मीना गंदगे, नागनाथ नागरगोजे, सचिन उफाडे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

**लातूर शहर महानगरपालिका, लातूर.**
**मुख्य कार्यालय, मेन रोड, लातूर.**
फोन - 02382, 242803, 246075, 246077
ई. मेल- electionlcmc022@gamil.com
स्थापना : -२५ ऑक्टोबर - २०११

जा.क्र./लाशमनपा/निवडणूक विभाग/ /२०२५ दिनांक :-०९/१०/२०२५

**लातूर शहर महानगरपालिका, लातूर सार्वत्रिक निवडणूक - २०२५ अंतिम प्रभाग रचना प्रसिद्धीची जाहीर सूचना**

लातूर शहर महानगरपालिकेच्या सन २०२५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारूप प्रभागांच्या भौगोलिक सीमा नकाशे, व्याप्ती निश्चिती केल्यासंदर्भात महाराष्ट्र शासन, अधिसूचना दिनांक ०३/०९/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

प्रारूप प्रभाग रचना अधिसूचनेवर प्राप्त झालेल्या हरकती व सुचनांच्या काळजीपूर्वक विचार करून, राज्य शासन नियुक्त प्राधिकृत अधिकारी, महाराष्ट्र शासन यांनी केलेल्या शिफारशी नुसार लातूर शहर महानगरपालिका, लातूर सार्वत्रिक निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोगाकडे पाठविणेत आलेला अंतिम प्रभाग रचना प्रस्तावास राज्य निवडणूक आयोग यांचे पत्र क्र. रानिआ/मनपा-२०२५ प्र.क्र.-३१/का.-५ दि. १०/१०/२०२५ अन्वये मान्यता मिळाली आहे. त्यानुसार लातूर शहर महानगरपालिकेच्या बाबतीत निवडावयाच्या सदस्यांची संख्या, प्रभाग संख्या निश्चित झालेली आहे.

लातूर शहर महानगरपालिका अंतिम प्रभाग रचनेच्या हद्दी दर्शविणारा नकाशा, त्यांची व्याप्ती निश्चित केल्यासंदर्भात माहिती परिशिष्ट १४ व १५ नागरिकांना पाहण्यासाठी महानगरपालिकेच्या https://mclatur.org या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येत आहे. तसेच महापालिका मुख्य कार्यालय, येथील नोटिसबोर्ड व सर्व प्रभाग कार्यालयाचे नोटिसबोर्ड प्रसिद्ध करण्यात येत आहे.

स्वाक्षरित/-
**श्रीमती मानसी (भा.प्र.से.)**
**आयुक्त**
**लातूर शहर महानगरपालिका, लातूर.**

**लातूर शहर महानगरपालिका, लातूर.**
**मुख्य कार्यालय, मेन रोड, लातूर.**
फोन - 02382, 242803, 246075, 246077
ई. मेल- electionlcmc022@gamil.com
स्थापना : -२५ ऑक्टोबर - २०११

जा.क्र./लाशमनपा/निवडणूक विभाग/ /२०२५ दिनांक :- ०९/१०/२०२५

**Latur City Municipal Corporation General Election-2025 Public Notice of Final Ward Formation**

Government of Maharashtra, Notification dated 03/09/2025 regarding the geographical boundary maps and extent of draft wards for the general elections to be held in the year 2025 of Latur City Municipal Corporation was published.

After carefully considering the objections and suggestions received on the draft ward formation notification, as per the recommendations made by the authorized Officer appointed by the State Government of Maharashtra, the final ward formation proposal sent to the hon'ble State Election Commission. This Proposal for the Latur City Municipal Corporation General Election has been approved vide No. SEC/MC-2025/CR-31/D5 Dated 08/10/2025, by hon'ble State Election Commission. Accordingly, the number of Wards and number of members to be elected in the general election of Latur City Municipal Corporation has been decided.

The map showing the boundaries of the final ward formation, information regarding their extent is being published on the website of the municipal corporation https://mclatur.org for the citizens to see in Annexure- 14 and 15. It is also being published on the notice board at the municipal corporation head office and the notice board of all ward offices.

Sd/-
**Smt. Mansi (I.A.S.)**
**Commissioner**
**Latur City Municipal Corporation**

# लातूर शहरात विद्यार्थ्यांमार्फत एक लाख वीस हजार वृक्ष लागवड होणार



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहर महानगरपालिकेच्या पुढाकाराने एक विदयार्थी- एक वृक्ष हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमासाठी सामाजिक वनीकरण विभाग व वन विभाग लातूर यांच्यामार्फत मोफत वृक्ष वाटप करण्यात येत आहेत. या उपक्रमाच्या माध्यमातून लातूर शहरातील एकुण ३५० शाळेमधील प्रत्येक विदयार्थ्यांना एक वृक्ष असे जवळपास १,२०,००० (अक्षरी एक लाख वीस हजार ) वृक्ष वाटप करण्यात येत आहेत. दि. ०९/१०/२०२५ रोजी लातूर शहरातील श्री श्री रविशंकर विदयामंदीर या शाळेमध्ये मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांच्या हस्ते विदयार्थ्यांना वृक्ष वाटप करण्यात आले. यावेळी लातूर शहरामध्ये वृक्ष लावणे किती महत्वाचे आहे याबाबत त्यांनी विदयार्थ्यांमध्ये जनजागृती केली. तसेच विदयार्थ्यांनी लावलेल्या झाडाची जबाबदारी शिक्षकांनी घ्यावी असे आवाहन केले.

यावेळी एक विदयार्थी- एक वृक्ष या उपक्रमाचे प्रणेते ए. एस नाथन यांनी विदयार्थ्यांना भावनिक मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी माणुस व वृक्ष यांचे नाते याबाबत स्पष्ट करून सांगितले. माणसाच्या वंशाला वृक्ष त्याची दुसरी आई म्हणून जन्म देतो परंतु माणुस वृक्षाचा वंशच होऊ देत नाही त्यांना कापून नष्ट करत आहे, उपटून टाकत आहे, तसेच जाळून टाकत आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमास लातूर मनपातील वाहन विभाग प्रमुख पवन सुरवसे, वृक्ष क्रांती मिशनचे संस्थापक (ऑक्सीजन मॅन) ए एस नाथन, मुख्याध्यापिका सोनाली कुलकर्णी (मराठी माध्यम), मुख्याध्यापिका विनया मराठे (इंग्रजी माध्यम),शिक्षण विस्तार अधिकारी धनराज गित्ते, नोडल प्रमुख तुकाराम पवार व शाळेतील शिक्षक कर्मचारी उपस्थित होते. लातूर शहर हरीत करण्यासाठी मनपा आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम चालू आहे.

## संप बेकायदेशीर; कामांवर विनाविलंब रूजू व्हा महावितरणकडून वीज कर्मचाऱ्यांना आवाहन

**मुंबई/प्रतिनिधी :** वीज कर्मचारी संघटनांच्या संयुक्त कृती समितीच्या सर्व मागण्यांशी सुसंगत भूमिका महावितरणच्या व्यवस्थापनाने यापूर्वीच बैठकीमध्ये स्पष्ट केली आहे. तरीही सात वीज कर्मचारी संघटनांनी दि. ९ ऑक्टोबरपासून ७२ तासांच्या संपाला सुरवात केली आहे.वीज ही अत्यावश्यक सेवा आहे व नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षक अधिनियम म्हणजेच मेस्मा लागू करण्यात आला आहे. त्यानुसार हा संप बेकायदेशीर असल्याचे महावितरणकडून स्पष्ट करण्यात आले आहे. राज्याच्या ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी संयुक्त कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांसोबत स्वतंत्र बैठक घेतली आहे. तीत खाजगीकरण व पुनर्रचनेसह संयुक्त कृती समितीच्या इतर सर्व मुद्द्यांशी सुसंगत व सकारात्मक भूमिका व्यवस्थापनाने स्पष्ट केली आहे. त्याचे लेखी इतिवृत्तही संयुक्त कृती समितीला देण्यात आले आहे.

हा संप टाळण्यासाठी संयुक्त कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांसोबत व्यवस्थापनाने वेळोवेळी प्रत्यक्ष चर्चा केली आहे. मात्र सर्वच मागण्यांशी पुरक असलेली स्पष्ट भूमिका जाहीर करूनही संयुक्त कृती समितीने संपावर जाण्याचा निर्णय कायम ठेवला आहे.

सध्या महाराष्ट्र अतिवृष्टी व पूर परिस्थितीच्या संकटातून सावरत आहे. त्यासाठी सर्व शासकीय यंत्रणा युद्धपातळीवर कार्यरत आहेत. दिवाळी सण देखील काही दिवसांवर आला आहे. या पार्श्वभूमिवर संपामध्ये सहभागी झालेल्या सर्वांनी शासकीय कर्तव्य बजावण्यासाठी आपापल्या कार्यालयांमध्ये विनाविलंब रूजू व्हावे. पूर परिस्थितीच्या संकट काळात तसेच सणासुदीच्या दिवसांत तत्पर वीज सेवा देत नागरिकांना सहकार्य करावे असे महावितरणच्या वतीने संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांनी संपकरी कर्मचाऱ्यांना केले आहे.

## राष्ट्रीय टपाल सप्ताह उत्साहात साजरा

**पुणे/प्रतिनिधी :** भारतीय डाक विभागामार्फत ६ ते १० ऑक्टोबर २०२५ दरम्यान राष्ट्रीय टपाल सप्ताह उत्साहात साजरा केला जात आहे. ९ ऑक्टोबर रोजी जागतिक टपाल दिन साजरा होत असून यंदाची थीम POSTFORPEOPLE LOCAL SERVICE. GLOBAL REACH अशी आहे. या आठवड्याद्वारे विभागाच्या आधुनिकीकरण, डिजिटल सक्षमीकरण आणि नागरिक केंद्रित सेवांबद्दल जनजागृती करण्यात येत आहे.

पुणे, अहमदनगर, सातारा आणि सोलापूर जिल्ह्यांचा समावेश असलेल्या पुणे टपाल क्षेत्रात सुमारे ७ हजार कर्मचारी १० हेड पोस्ट ऑफिस, ४८७ सब पोस्ट ऑफिस आणि २१८२ ब्रांच पोस्ट ऑफिसमधून सेवा देत आहेत. आठवड्यात विविध उपक्रम, पत्रलेखन स्पर्धा, वृक्षारोपण, पथनाट्य आणि ग्राहक संवाद कार्यक्रम आयोजित केले गेले आहेत.

पुणे क्षेत्रात नवीन टपाल कार्यालये सुरू करण्यात आली असून, डाक विभागाने मेल, बँकिंग आणि इन्शुरन्स क्षेत्रात डिजिटल सेवा विस्तार केल्या आहेत. AePS सुविधा, इंडिया पोस्ट पेमेंट्स बँकेतील लाखो खाते आणि विविध विमा योजनांमुळे नागरिकांना घरपोच सेवा मिळत आहेत. व्होकल फॉर लोकल आणि एक पेड माँ के नाम सारख्या उपक्रमांद्वारे सामाजिक जबाबदारी पार पाडत टपाल विभाग लोकाभिमुखतेचा उत्कृष्ट आदर्श निर्माण करत आहे.

## प्रा. डॉ. विनोद चव्हाण यांना सायन्स ऑलिम्पियाड फाउंडेशनचा बेस्ट कोऑर्डिनेटर पुरस्कार

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथील रहिवाशी आणि नांदेड एज्युकेशन सोसायटी द्वारा संचलित पीपल्स कॉलेज, नांदेड येथील इंग्रजी विषयाचे ज्युनिअर कॉलेजचे प्रा.डॉ. विनोद चव्हाण यांना शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठीचा सायन्स ऑलिम्पियाड फाउंडेशन द्वारा प्रतिष्ठित एसओएफ बेस्ट कोऑर्डिनेटर पुरस्कार देऊन नुकतेच सन्मानित करण्यात आले आहे.



हा पुरस्कार विद्यार्थ्यांमध्ये सायन्स ऑलिम्पियाड स्पर्धा परीक्षे विषयी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करून प्रोत्साहन देण्यासाठी केलेल्या त्यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल म्हणून देण्यात आला आहे.

डॉ. विनोद चव्हाण लातूर येथील राजा नारायणलाल लहोटी इंग्लिश स्कूलमध्ये कार्यरत होते. महाराष्ट्र शासनाच्यावतीने पवित्र पोर्टल मार्फत पीपल्स कॉलेज नांदेड येथे त्यांची निवड झाली आहे. आजपर्यंत शिक्षण, सामाजिक आणि पत्रकारितेच्या क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांना जिल्हा, मराठवाडा आणि राज्यस्तरावरील अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. मराठवाडा शिक्षक भूषण पुरस्कार, वृक्षमित्र पुरस्कार, राज्यस्तरीय उत्कृष्ट वार्ता, सर्वोत्कृष्ट पत्रकार पुरस्कार हे त्यांपैकी विशेष उल्लेखनीय आहेत.

डॉ. विनोद चव्हाण यांना ट्रॉफी आणि रु. १,००० चा धनादेश देऊन नुकतेच सायन्स ऑलिम्पियाड फाउंडेशन द्वारा सन्मानित करण्यात आले आहे. मिळालेल्या पुरस्काराबद्दल प्रा.डॉ. विनोद चव्हाण यांचे सर्वांनी अभिनंदन केले आहे.

## मुख्याध्यापकांची बदली रद्द करावी: पालिकेसमोर तिसऱ्यांदा आंदोलन

**लातूर/प्रतिनिधी :** शहरातील मंठाळेनगरातील मनपा शाळा क्रमांक ९ मधील मुख्याध्यापक शिवदास शिंदे यांची बदली प्रशासकीय बदली करण्यात आल्याने या विरोधात गुरुवारी तिसऱ्यांदा आंदोलन करण्यात आले. दरम्यान या भागातील नागरिक मुख्याध्यापकांची बदली रद्द करण्यावर अडून आहेत. मनपा शाळा क्रमांक ९ मधील मुख्याध्यापक शिवदास शिंदे यांची प्रशासकीय बदली करण्यात आली आहे. या बदली विरोधात सुरूवातीला विद्यार्थी, पालकांनी ठिय्या आंदोलन केले होते. त्यानंतर काही पालकांनी एकदिवसीय धरणे आंदोलन केले. दोन वेळा आंदोलने करूनही बदली रद्द करण्यात येत नसल्याने गुरुवारी तिसऱ्यांदा महानगरपालिकेच्या पायऱ्यांवरच ठिय्या आंदोलन करण्यात आले. सदर बदली रद्द करण्यात यावी, या मागणीसाठी पालकांनी शुक्रवारी महा नगरपालिकेसमोर एक दिवशीय धरणे आंदोलन केले. यापूर्वी विद्यार्थी, पालकांनी शाळेसमोर ठिय्या आंदोलन करून बदलीला विरोध दर्शविला होता. त्यानंतर महा नगरपालिकेसमोर एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले होते. मुख्याध्यापक शिवदास शिंदे हे महानगरपालिकेच्या मंठाळेनगरातील सावित्रीबाई फुले शाळा क्रमांक ९ मध्ये होते. जून २०२४ पासून ते या शाळेत कार्यरत होते. त्यांच्यामुळे अनेक मुलांना शिस्त लागली. त्यांची गुणवत्ता वाढली असताना त्यांची बदली करण्यात आली आहे.

## प्रिमॅट्रिक शिष्यवृत्ती योजनेसाठी विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज भरण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून इयत्ता पाचवी ते दहावीच्या विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी प्रिमॅट्रिक शिष्यवृत्ती योजनेचे अर्ज भरणेसाठी महाडीबीटी पोर्टल सुरु करण्यात आलेले आहे. सरल पोर्टलद्वारे महाडीबीटी पोर्टलवर सर्व विद्यार्थ्यांचा डेटा उपलब्ध करुन दिलेला आहे.

तरी पात्र शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचे अर्ज मुख्याध्यापक यांनी तात्काळ महाडीबीटी पोर्टलवर भरून ऑनलाईन भरलेले अर्ज महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन सहायक संचालक, इतर मागास बहुजन कार्यालय, लातूर यांचेकडे मंजुरीसाठी पाठवावेत, असे आवाहन लातूर येथील इतर मागास बहुजन कल्याण सहायक संचालक अभय अटकळ इतर यांनी केले आहे.

## टी.सी.हरवली आहे

पठाण सारिबा अनिसखान या नावाची दहावी पासची पोतदार इंटरनॅशनल स्कूल लातूरची टी.सी. तहसील कार्यालय ते छत्रपती शिवाजी महाराज चौक, लातूर प्रवासात हरवली आहे. कोणास सापडल्यास आणून देणाऱ्यास बक्षीस दिले जाईल.

संपर्क : ९५८८६७५३९१

निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

### औषधसंहिता ..

हवे कशाला डॉक्टर
रे सर्दी पडशा करता
दवाखान्यात जायचे
भलता आग्रह धरता

पाळत नाही आपण
कधी औषध संहिता
मनाने घेऊन औषधे
बाधा आणतो हिता

जुन्याप्रिस्क्रिप्शनवर
कशीही औषधे घेता
दोष आजार पणाचा
अवघ्या जगांला देता

डॉक्टरां पेक्षा विद्वान
बरा मेडिसिनविक्रेता
हवेत असे गि-हाईक
आपणांसारखा क्रेता

फी वाचवावी वैद्यांची
त्रास नको तो नसता
असाचं हवा जादुगार
ऋणांस ना तपासता

एक्सपायरी डेट काय
कशास उगाचं पाहता
नंतर सोसत बसायचे
रे रिक्शनची दाहता

चिंता वाढवी सर्वांची
वैद्यकीय खर्च वाढता
निर्माण होतात बवाल
विचित्र कुठेही घडता

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

## २० लाख ६४ हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा, सुगंधित तंबाखू वाहनासह जप्त

### - ०४ व्यक्ती विरुद्ध २ गुन्हे दाखल - स्थानिक गुन्हे शाखेची अवैध धंद्यावर कारवाई

**लातूर/प्रतिनिधी :** २० लाख ६४ हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा, सुगंधित तंबाखू वाहनासह जप्त या बाबत समजलेली माहिती अशी की, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात अवैध धंद्यावर कठोर कारवाईसाठी मोहीम जिल्ह्यामध्ये राबविण्यात येत आहे.



त्या अनुषंगाने अवैध धंद्यावर कारवाई करीत असताना दिनांक ०८ ऑक्टोंबर व ०९ ऑक्टोंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळालेल्या माहितीवरून काही इसम महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेले अन्नपदार्थ गुटखा व तंबाखूजन्य पदार्थाची अवैध विक्री व्यवसाय, वाहतूक व साठवणूक करत असल्याची माहिती मिळाली.

सदर माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांचे मार्गदर्शनात सदरचे पथक दिनांक ०८ व ०९ ऑक्टोंबर रोजी लातूर शहरातील विविध ठिकाणी सापळा लावून महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्यामध्ये विक्रीसाठी प्रतिबंधित केलेला गुटखा व सुगंधित तंबाखूची अवैध विक्री व्यवसाय, वाहतूक करणाऱ्या वर ०२ गुन्हे दाखल करण्यात आले असून दोन्ही गुन्ह्यात ०८ लाख १४ हजार ९४६ रुपयांच्या प्रतिबंधित गुटखा व सुगंधित तंबाखूचा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच गुन्ह्यामध्ये वापरलेली १२ लाख ५० हजार रुपयाची दोन चारचाकी वाहन असा एकूण २० लाख ६४ हजार ९४६ रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

प्रतिबंधित गुटख्याची अवैधरित्या विक्री, वाहतूक, साठवणूक करताना मिळून आलेले इसम नामे अनिल भिसे वय २४ वर्षे राहणार,राजेशिवाजीनगर, लातूर. अकीब मोहम्मदसाब शेख, वय ३१ वर्ष, राहणार पटेल चौक, माळे गल्ली, लातूर. ३) मुनवर सादिक पटवेकर, वय ३१ वर्ष, राहणार मैसूर कॉलनी, लातूर. ४) एजाज हुजूर शेख, राहणार सुजाउद्दीन कॉलनी, ताजुद्दीनबाबा दर्गा जवळ, लातूर.(फरार) याचे विरुद्ध पोलीस ठाणे एमआयडीसी येथे दोन गुन्हे दाखल करण्यात आले असून गुन्ह्याचा पुढील तपास एमआयडीसी पोलीस करीत आहेत. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे,अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक सदानंद भुजबळ, पोलीस उपनिरीक्षक प्रमोद देशमुख, पोलीस अंमलदार रियाज सौदागर, साहेबराव हाके, मोहन सुरवसे, मनोज खोसे, सचिन धारेकर,अर्जुन राजपूत, चंद्रकांत डांगे,राजेश कंचे यांनी केली आहे.

## सीआरपीएफ कॅम्पमध्ये वन्यजीव सप्ताह साजरा

### वृक्षारोपण आणि जैवविविधता रक्षणावर मार्गदर्शन

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर वनविभाग, लातूर जिल्हा जैवविविधता समिती व केंद्रीय राखीव पोलिस दलाच्यावतीने वन्यजीव सप्ताहानिमित्त लातूर येथील सीआरपीएफ प्रशिक्षण केंद्राच्या प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी पर्यावरण संतुलन व जैवविविधता रक्षण यावर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.



विभागीय वनाधिकारी जे. एन. येडलावार, सहाय्यक वनरक्षक रागुल शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली वन्यजीव सप्ताह साजरा झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कमांडट पारसनाथ होते. वनपरिक्षेत्र अधिकारी धनंजय पोटे, सहाय्यक कमांडंट विशाल कोरे, प्रशांतकुमार रॉय, जैवविविधता समिती सदस्य शहाजी पवार वनपरीमंडळ अधिकारी निलेश बिराजदार, सर्पमित्र नेताजी जाधव, बालाजी पाटील, महेश पवार, जी.एच घुले आदिंची उपस्थिती होती.

यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी पोटे यांनी वन्यजीव सप्ताह व वनकायद्याबाबत अभ्यासपूर्ण माहिती दिली. एखाद्या वन्यजीवास मारण्याचा विचार व त्यासाठी केलेली कृती हाही गुन्हा असल्याचे सांगत त्यांनी वने व वन्यजीव रक्षणाची अनिवार्यता सांगितली. शहाजी पवार यांनी वसुंधरा रक्षणात झाडे आणि वन्यजीवांचे महत्व यावर माहिती दिली. सर्पमित्र नेताजी जाधव यांनी सापांबद्दल शास्त्रोक्त माहिती देत सापांबाबतचे गैरसमज दूर करावेत, असे सांगितले. अध्यक्षीय समारोपात कमांडट पारसनाथ यांनी जैवविविधता रक्षणात झाडे आणि वन्यजीवांची भूमिका सांगितली. सीआरपीएफच्या वतीने त्यांच्या परिसरात हजारो झाडांचे संवर्धन केल्याने ही अनुकुलता विविध पक्षांसह वन्यजीवांच्या अधिवासासाठी जमेची ठरल्याचे सांगत वसुंधरा रक्षणासाठी आवाहन केले. प्रास्ताविक व सूत्रसंचलन सहाय्यक कमांडंट विशाल कोरे यांनी केले. आभार सहाय्यक कमांडंट प्रशांतकुमार रॉय यांनी मानले.

टोनर रिफिलिंग



फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट ट्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade   Mo. 9422472502,   RNI 47034/64,   POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे.   मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे  मो. ९४२२४७२५०२   आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६